cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–५१ | रविवार दि.१० मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### राष्ट्रीय राजकारणात प्रादेशिक पक्षांची उतरती कळा

नुकत्याच पार पडलेल्या पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांनी भारतीय राजकारणाला नवे वळण दिल्याचे चित्र दिसत आहे. या निकालांनी केवळ सत्तांतर घडवले नाही, तर देशातील प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व, विरोधकांची एकजूट आणि राष्ट्रीय राजकारणाची भावी दिशा यांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. अनेक दशकांपासून भारतीय लोकशाहीची ओळख बहुपक्षीय आणि विविधतेने नटलेल्या राजकीय व्यवस्थेची राहिली आहे.

# कृषी विभागाची धडक मोहीम; ७८६ केंद्रांचे परवाने निलंबित

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात युद्धजन्य परिस्थितीमुळे खतांच्या आयातीवर मर्यादा आल्याने युरियाच्या कृत्रिम तुटवड्याचा फायदा घेत काळाबाजार आणि साठेबाजी करणाऱ्या खत विक्रेत्यांविरोधात कृषी विभागाने मोठी मोहीम हाती घेतली आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांची अडवणूक करणाऱ्या तब्बल १० हजार खत विक्री केंद्रांची तपासणी करण्यात आली असून, नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात आली आहे.**




१ एप्रिल ते ५ मे दरम्यान राज्यातील आठही विभागांत विशेष पथकांमार्फत ९ हजार ९८९ खत विक्री केंद्रांची तपासणी करण्यात आली. या तपासणीत ६ हजार ९२४ ठिकाणी खतांचा काळाबाजार तर २५३ ठिकाणी साठेबाजी होत असल्याचे उघड झाले. यानंतर कृषी विभागाने १ हजार ९८० केंद्रांना 'कारणे दाखवा' नोटिसा बजावल्या आहेत. या मोहिमेत आतापर्यंत ७८६ खत विक्री केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले असून, ५५ केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. संबंधितांवर दंडात्मक कारवाईची प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, काही भागांत खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून चढ्या दराने विक्री होत असल्याच्या तक्रारी कृषी विभागाकडे प्राप्त झाल्या होत्या. याची गंभीर दखल घेत विभागाने ही राज्यव्यापी तपासणी मोहीम सुरू केली. या कारवाईदरम्यान १२ ठिकाणी एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. त्यामध्ये नागपूर विभागात ३, पुणे विभागात ३, ठाणे व नाशिक विभागात प्रत्येकी २, तर कोल्हापूर आणि अमरावती ▶▶ पान २ वर

# अधिकार नसताना सुनावणी घेतली, ५० हजाराचा दंड !

## अविनाश पाठक यांचा आखणी एक कारनामा न्यायालयासमोर

छ.संभाजीनगर – धाराशिव । प्रतिनिधी


**बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन आणि मावेजा वाटपातील कोट्यवधी रुपयांच्या कथित घोटाळ्याप्रकरणी नुकतेच गजाआड झालेले तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्यासमोरील कायदेशीर अडचणी आता आणखी वाढल्या आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने एका महत्त्वपूर्ण निर्णयात त्यांना ५० हजार रुपयांचा दंड सुनावला आहे. धाराशिव येथे अपर जिल्हाधिकारी या पदावर कार्यरत असताना, कायद्याने कोणताही अधिकार दिलेला नसताना त्यांनी एका प्रकरणाची सुनावणी घेऊन चुकीचा निर्णय दिला. ज्याबद्दल न्यायालयाने ही कठोर कारवाई केली आहे.**




या प्रकरणाची सुनावणी घेताना न्यायमूर्ती सिद्धेश्वर ठोंबरे यांनी हा महत्त्वपूर्ण निकाल दिला असून, अत्यंत कडक शब्दांत प्रशासकीय कार्यपद्धतीवर ताशेरे ओढले आहेत. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे या दंडाची रक्कम सरकारी तिजोरीतून न देता अविनाश पाठक यांना स्वतःच्या खिशातून भरावी लागणार आहे. न्यायालयाने दिलेल्या स्पष्ट निर्देशानुसार, ही रक्कम आगामी चार आठवड्यांच्या आत औरंगाबाद मधील शासकीय कर्करोग रुग्णालयात जमा करणे बंधनकारक करण्यात आले आहे. बीड मधील तब्बल २४१ कोटी रुपयांच्या घोटाळ्यात एसआयटीच्या ▶▶ पान २ वर

# दैनंदिन वस्तू महागणार!

## कच्चा माल, पॅकेजिंग खर्च वाढल्याने एफएमसीजी कंपन्यांचा निर्णय; घरगुती बजेटवर ताण पडणार



मुंबई । प्रतिनिधी

साबण, बिस्किटे, खाद्यतेल, शॅम्पू यांसारख्या दैनंदिन वापराच्या वस्तू लवकरच महाग होण्याची शक्यता आहे. वाढत्या कच्च्या मालाच्या किमती, पॅकेजिंग खर्चातील वाढ आणि पश्चिम आशियातील तणावामुळे एफएमसीजी कंपन्यांवर खर्चाचा दबाव वाढला असून, डाबर इंडिया, हिंदुस्तान युनिलिव्हर, नेस्ले इंडिया, मॅरिको, ब्रिटानिया आणि आयटीसीसारख्या कंपन्या उत्पादनांच्या किमती वाढवण्याच्या तयारीत आहेत.

डाबर इंडियाचे ग्लोबल मुख्य कार्यकारी अधिकारी मोहित मल्होत्रा यांनी सांगितले की, आर्थिक वर्ष २०२६–२७ च्या ▶▶ पान २ वर

# सदावर्तेंच्या ताफ्यावर मनसैनिकांनी शाईफेक करत सुपाऱ्या भिरकावल्या

जालना । प्रतिनिधी

राज्याच्या राजकारणात आपल्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे चर्चेत राहणारे वकील ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्या गाडीवर शनिवारी जालन्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) कार्यकर्त्यांनी हल्ला केला. या घटनेत मनसैनिकांनी सदावर्तेंच्या गाडीवर आधी शाईफेक केली आणि त्यानंतर त्यांच्यावर सुपाऱ्या फेकून मारल्याने



परिसरात मोठा गोंधळ उडाला.

ॲड. गुणरत्न सदावर्ते हे जालन्यातील धनगर समाज बांधवांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आणि उपोषणकर्त्यांची भेट घेण्यासाठी आले होते. ते जालन्यात दाखल होताच, समृद्धी महामार्गावरून शहरात येत असताना काकडे पेट्रोल पंपाजवळ आधीच दबा धरून बसलेल्या मनसे कार्यकर्त्यांनी त्यांचा ताफा अडवला. कार्यकर्त्यांनी 'राज ठाकरे झिंदाबाद' अशा घोषणा देत सदावर्तेंच्या गाडीवर काळी शाई फेकली. शाईफेक केल्यानंतर त्यांनी सदावर्तेंच्या दिशेने सुपाऱ्या फेकून मारल्या. राजकीय वर्तुळात 'सुपारी देणे' ▶▶ पान २ वर

# शुभेंदू अधिकारी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रिपदी विराजमान

## भव्य शपथविधी सोहळ्याला मोदी–शाह, फडणवीस, शिंदे, सुनेत्रा पवारांची हजेरी

कोलकात्ता । वृत्तसंस्था

पश्चिम बंगालच्या राजकीय इतिहासात एका नव्या युगाची सुरुवात झाली आहे. भारतीय जनता पक्षाचे नेते शुभेंदू अधिकारी यांनी शनिवारी राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. कोलकाता येथील ऐतिहासिक ब्रिगेड परेड ग्राऊंडवर झालेल्या एका भव्य सोहळ्यात राज्यपाल आर. एन. रवि यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या ऐतिहासिक सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह देशातील दिग्गज नेते उपस्थित होते.

या विधानसभा निवडणुकीत भाजपने २९३ पैकी २०७ जागांवर प्रचंड विजय मिळवून पूर्ण बहुमत प्राप्त केले आहे. तर १५ वर्षे सत्तेत असलेल्या ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला केवळ ८० जागांवर समाधान मानावे लागले. स्वतः शुभेंदू अधिकारी यांनी भवानीपूर मतदारसंघातून ममता बॅनर्जी यांचा पराभव करत जायंट किलर ठरले. शपथविधी सोहळ्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी, शुभेंदू अधिकारी आणि प्रदेशाध्यक्ष समिक भट्टाचार्य एका विशेष रथावरून व्यासपीठाकडे ▶▶ पान २ वर

# शरद पवार गटाच्या नेत्यावर शाईफेक

पुणे । प्रतिनिधी


राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवंडे यांच्यावर शाईफेक करण्यात आली आहे. किर्तनकार संग्राम भंडारे आणि दहा ते पंधरा गोरक्षकांनी ही शाईफेक केली असल्याचा आरोप विकास लवांडे यांनी केला असून याचा व्हिडिओही समोर आला आहे. या घटनेनंतर विकास लवंडे यांनी आक्रमक भूमिका घेतली असून लोणी काळभोर पोलीस स्टेशनमध्ये सत्याग्रह करणार असल्याचे सांगितले आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर शाईफेक करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. ▶▶ पान २ वर

# ११ वी ऑनलाईन प्रवेशासाठी कॅप फेरी–१ चे वेळापत्रक जाहीर

## ८ मे पर्यंत सात लाख ७४ हजार ९१८ विद्यार्थ्यांची नोंदणी

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी नियमित कॅप फेरी–१ चे वेळापत्रक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने जाहीर केले आहे. ८ मे रोजी इयत्ता दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जाचा भाग–१ आणि भाग–२ भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली



असून, ८ मे २०२६ पर्यंत एकूण सात लाख ७४ हजार ९१८ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा भाग– १ भरून नोंदणी केली आहे. इयत्ता ११ वी प्रवेश प्रक्रियेसाठी ▶▶ पान २ वर

# विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात पावसाचा इशारा

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील अनेक भागात ढगाळ हवामानासह पूर्वमोसमी पावसाला पोषक स्थिती निर्माण झाल्याने, उन्हाचा ताप काहीसा कमी झाला आहे. कोकणात उष्ण आणि दमट हवामान असून पूर्व विदर्भासह मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात विजांसह वादळी पावसाची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे. तर उर्वरित राज्यात कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे.



कोकणातील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड जिल्ह्यात काही ठिकाणी उष्ण आणि दमट हवामानाचा अंदाज आहे. तर रत्नागिरी. सिंधुदुर्ग जिल्ह्यात उष्ण आणि दमट हवामानसह हलक्या पावसाची शक्यता व्यक्त ▶▶ पान २ वर

# विद्यमान जिल्हाधिकाऱ्यांच्या तांत्रिक तपासणीमुळेच अविनाश पाठक कोठडीत

बीड । प्रतिनिधी

**कोणत्याही जिल्ह्यात नूतन जिल्हाधिकारी रुजू झाल्यानंतर त्यांच्यासमोर मागील काळातील येणाऱ्या फाईल्सवर नूतन जिल्हाधिकारी बारकाईने निरीक्षण करतात. त्यातच राष्ट्रीय महामार्गावरील भूसंपादनाच्या वाढीव निधीच्या फाइल्स समोर आल्यानंतर विद्यमान जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी काही वेळ घेतला. त्यानंतर यामध्ये मोठ्या प्रमाणात गडबड असल्याचे समोर आल्यानंतर प्रथम त्यांनी जुन्या फाईल्स हस्ताक्षर तज्ज्ञाकडे पाठवून तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांच्या सह्यांची खात्री केली आणि त्यानंतर उपजिल्हाधिकारी धुमाळ यांना निर्देश देऊन गुन्हा दाखल केला.**




बीड– धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनातील वाढीव मोबदल्याच्या १५४ प्रकरणात २४१ कोटी ६२ लाख रुपयांच्या घोटाळ्यात तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना बीड पोलिसांनी गुरुवारी अटक केली. या प्रकरणात ७२ कोटी रुपयांचा वाढीव मोबदला वाटप करुन या प्रकरणातील



कागदपत्रांमध्ये अविनाश पाठक यांच्या स्वाक्षरीबाबतचे अहवाल तपासल्यानंतर त्यांना चौकशीसाठी लातूरहून ताब्यात घेण्यात आले. भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यास अटक होण्याची अलिकडच्या काळातील ही पहिलीच वेळ असल्याने खळबळ उडाली आहे. पण हा घोटाळा उघडकीस आला कसा ? याचे तपशील कमालीचे रंजक आहेत. अविनाश पाठक यांची २२ एप्रिल २०२५ मध्ये बदली झाली. त्यांच्या जागी विवेक जॉन्सन रुजू झाले. नवे जिल्हाधिकारी रुजू झाल्यानंतरही अनेक प्रकरणात जुन्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सह्या होत आणि वाढीव मोबदल्याची प्रकरणे मंजूर होत. ही प्रक्रिया सलग पाच सहा महिने सुरू होती. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अशा प्रकरणाची तपासणी केली. वाढीव मोबदल्याच्या लवाद प्रकरणात १७ एप्रिल २०२५ अशी तारीख नमूद करुन पाच महिने उशिरा भूसंपादनाच्या वाढीव मोबदला मंजूर झाल्याची प्रकरणे दाखल करण्यात आली. भूसंपादनाची मूळ रक्कम ६८ कोटी रुपये असताना वाढीव मंजूर मोबदला ३१० कोटी २० लाख रुपये दाखविण्यात आला. हा मंजूर ▶▶ पान २ वर

### पोलिसांचा गराडा तोच पण...

पूर्वी अविनाश पाठक जिल्हा परिषदेचे सीईओ त्यानंतर बीडचे जिल्हाधिकारी असताना त्यांच्या आजूबाजुला पोलिसांचा मोठा पहारा असायचा. मोठ्या रुबाबात ते कार्यालयात व कार्यालयाच्या बाहेर असायचे, मात्र ते आताही पोलिसांच्या गराड्यातच आहेत मात्र फरक एवढाच आहे की, आता पाठक हे स्वतः आरोपी आहेत आणि म्हणूनच पोलिसांचा गराडा आहे.

## थोडक्यात...

### डॉ.आंबेडकर जयंतीत तिघांना बेदम मारहाण

नांदेडः धर्माबाद तालुक्यातील माष्टी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या मिरवणुकीवरून काही दिवसापूर्वी वाद झाला होता. यावरून पुन्हा ८ मे रोजी रात्री रस्त्यावरून जात असताना जुन्या भांडणाच्या कारणावरून २ महिलासह एकास शिविगाळ करून मिरचीचे पूड आगावर टाकून विटा ने काठीने जबर मारहाण केली. याप्रकरणी कुंडलवाडी पोलीस ठाण्यात १६जनावर ॲट्रॉसिटी ॲक्ट कायद्यासह बेदम मारहाण केल्याप्रकरणी शनिवारी सकाळी गुन्हे दाखल केले आहेत. मिरवणूक रस्त्यावरून नेण्याच्या कारणावरून काही नागरिकांसोबत वाद झाला होता. या वादावरून सुनील पिराजी सोनकांबळे, मीराबाई प्रकाश भालेराव, शांताबाई माधवराव सोनकांबळे यांना रस्त्यावरून जात असताना पूर्वीचा राग धरून शिवीगाळ केली. मिरचीची पूड अंगावर टाकून विटने लाकडाने जबर मारहाण केली आहे. कुंडलवाडी ठाण्यात १६ जणावर ॲट्रॉसिटी ॲक्ट कायद्यासह बेदम मारहाण केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### अत्याधुनिक अग्नी क्षेपणास्त्राची चाचणी

भुवनेश्वरः भारतीय संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने संरक्षण क्षेत्रात एक मोठी झेप घेतली आहे. भारताने अत्याधुनिक अशा 'अग्नी' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली असून, यामुळे देशाच्या सामरिक आणि संरक्षण क्षमतेत मोलाची भर पडली आहे. या क्षेपणास्त्राचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हे तंत्रज्ञानाने सज्ज आहे. या प्रगत तंत्रज्ञानामुळे एकाच क्षेपणास्त्राद्वारे एकाच वेळी वेगवेगळ्या दिशांना असलेल्या अनेक लक्ष्यांवर अचूक मारा करणे शक्य होणार आहे. या चाचणीमुळे भारताची अण्वस्त्र प्रतिबंधक क्षमता अधिक मजबूत झाली आहे. एकाच वेळी अनेक शत्रू तळांना उद्ध्वस्त करण्याची क्षमता प्राप्त झाल्याने, जगातील मोजक्या बलाढ्य देशांच्या पंक्तीत भारताने आपले स्थान अधिक भक्कम केले आहे. आधुनिक संरक्षण तंत्रज्ञानात स्वावलंबी होण्याच्या दिशेने हे एक ऐतिहासिक पाऊल मानले जात आहे.

### व्हॉट्सॲपवर उर्दू कविता शेअर करणे गुन्हा नाही

जबलपूर : सोशल मीडिया फ्लॅटफॉर्म व्हॉट्सॲपवर केलेली कविता शेअर करणे हा गुन्हा नाही. संबंधित कवितेमध्ये धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचा किंवा द्वेषभाव वाढीस लावल्याचा कोणताही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संदर्भ नाही, त्यामुळे ही कविता आक्षेपार्ह मानण्यास कोणताही वाव उरत नाही, असे स्पष्ट करत मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या जबलपूर खंडपीठाने शिक्षकावर दाखल करण्यात आलेला गुन्हा रद्द करण्याचे आदेश दिले. बेऱ्हया या शीर्षकाची एक उर्दू कविता वाचतानाचा स्टेटस मध्य प्रदेशातील बैतुल जिल्ह्यातील चिचोली शहरातील शिक्षक फैजान अन्सारी यांनी ठेवला होता. पोलिसांनी या स्टेटसचे वर्णन महिला विरोधी असे करत गुन्हा दाखल केला होता. तसेच, स्टेटसद्वारे धार्मिक भावना दुखावल्याचा आरोपही त्यांच्यावर करण्यात आला होता. त्यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५३ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०९ मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७१.५० क्विंटल | १,९१० | २,६५० | २,३२९ |
| ज्वारी/हायब्रिड : १५७.५० क्विंटल | १,७०० | ४,२३१ | २,४३१ |
| मका/लोकल: ३४.५० क्विंटल | १,४८२ | १,८१६ | १,६६९ |
| तूर : ५.०० क्विंटल | ६,००० | ६,५०१ | ६,२५० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ६८.०० क्विंटल | २,००० | ३,५०० | २,३०० |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |

cmyk

cmyk



अग्रलेख

# राष्ट्रीय राजकारणात प्रादेशिक पक्षांची उतरती कळा

नुकत्याच पार पडलेल्या पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांनी भारतीय राजकारणाला नवे वळण दिल्याचे चित्र दिसत आहे. या निकालांनी केवळ सत्तांतर घडवले नाही, तर देशातील प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व, विरोधकांची एकजूट आणि राष्ट्रीय राजकारणाची भावी दिशा यांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. अनेक दशकांपासून भारतीय लोकशाहीची ओळख बहुपक्षीय आणि विविधतेने नटलेल्या राजकीय व्यवस्थेची राहिली आहे. मात्र आता देशातील राजकीय समीकरणे हळूहळू दोन प्रमुख राष्ट्रीय पक्षांभोवती केंद्रित होत असल्याचे संकेत मिळत आहेत. भाजप आणि काँग्रेस या दोन राष्ट्रीय पक्षांभोवती राजकारण फिरू लागल्याने भारताची वाटचाल 'बायपोलर पॉलिटिकल सिस्टिम'कडे सुरू झाली आहे का, हा प्रश्न आता प्रकर्षाने उपस्थित होत आहे.

या निवडणुकांमधील सर्वांत मोठा राजकीय धक्का म्हणजे पश्चिम बंगालमधील सत्तांतर मानले जात आहे. अनेक वर्षे प्रादेशिक अस्मितेच्या जोरावर सत्ता टिकवून ठेवणाऱ्या तृणमूल काँग्रेसचा पराभव आणि भाजपचा उदय हा केवळ एका राज्यापुरता मर्यादित विषय नाही. तो देशातील प्रादेशिक पक्षांच्या भवितव्याचा राजकीय संकेत मानला जात आहे. एकेकाळी केंद्रातील सत्तेला आव्हान देणारे आणि राष्ट्रीय राजकारणात निर्णायक भूमिका बजावणारे प्रादेशिक पक्ष आज स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व टिकवण्यासाठी झगडताना दिसत आहेत.ङ्गआज देशात स्वतंत्रपणे प्रभावी सत्ता असलेल्या प्रादेशिक पक्षांची संख्या झपाट्याने कमी होत चालली आहे. आंध्र प्रदेशातील तेलगू देसम पक्ष आणि जम्मू-काश्मीरमधील नॅशनल कॉन्फरन्स हे काही मोजके पक्ष अद्याप अस्तित्व टिकवून आहेत. परंतु त्यांनाही राष्ट्रीय राजकीय समीकरणांच्या प्रभावापासून दूर राहता आलेले नाही. झारखंड मुक्ती मोर्चा काँग्रेसच्या आघाडीतील घटक पक्ष म्हणून ओळखला जातो, तर तेलगू देसम पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या समीकरणात दिसतो. त्यामुळे पूर्णपणे स्वतंत्र आणि स्वबळावर राष्ट्रीय पक्षांना आव्हान देणारा प्रादेशिक पक्ष जवळजवळ उरलेला नाही. पंजाबमधील आम आदमी पक्ष हा एक अपवाद असला तरी त्यालाही आता राष्ट्रीय पक्षाचा दर्जा प्राप्त झाला आहे. भारतीय राजकारणाचा इतिहास पाहिला तर काँग्रेसच्या एकछत्री सत्तेविरुद्ध निर्माण झालेला जनता पक्षाचा प्रयोग आठवतो. विविध विचारसरणींचे आणि प्रादेशिक प्रभाव असलेले पक्ष एकत्र येऊन त्यांनी काँग्रेसला आव्हान दिले होते. आज परिस्थिती उलट दिशेने फिरताना दिसते. आता भाजपच्या वाढत्या प्रभावाविरुद्ध काँग्रेसभोवती विरोधक एकत्र येण्याची वेळ आली आहे. कारण काँग्रेस हा एकमेव पक्ष आहे ज्याचे अस्तित्व देशाच्या जवळपास सर्व राज्यांत काही ना काही प्रमाणात टिकून आहे. चार राज्यांमध्ये काँग्रेसची सत्ता आहे आणि राष्ट्रीय पातळीवर भाजपला थेट टक्कर देण्याची क्षमता असलेला तो एकमेव विरोधी पक्ष मानला जातो. मात्र काँग्रेससमोरचे आव्हान केवळ भाजपला विरोध करण्यापुरते मर्यादित नाही. प्रादेशिक पक्षांचा विश्वास संपादन करणे, त्यांना सन्मानाने सोबत घेणे आणि एक सक्षम, स्थिर व विश्वासार्ह पर्याय उभा करणे ही मोठी जबाबदारी काँग्रेसवर येऊन पडली आहे. यापूर्वीच्या आघाडी सरकारांच्या काळात अनेक प्रादेशिक पक्षांनी केंद्र सरकारवर दबाव टाकत आपापले हितसंबंध जपण्याचा प्रयत्न केला. परिणामी केंद्रातील सरकारे अस्थिर असल्याची भावना जनमानसात निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर मतदारांनी स्थैर्याच्या नावाखाली भाजपला प्राधान्य दिले. त्यामुळे विरोधकांनी आता केवळ भाजपविरोधी भूमिका घेऊन चालणार नाही, तर जनतेसमोर स्थिर आणि सुसंगत प्रशासनाचा आराखडा मांडावा लागेल. आज भाजपला पूर्ण बहुमत नसले तरी त्यांच्या नेतृत्वाभोवती आघाडीचे पक्ष घट्ट बांधले गेलेले दिसतात. प्रादेशिक पक्षांचे नेतेदेखील केंद्रातील सत्तेविरुद्ध उघड भूमिका घेण्यास टाळाटाळ करताना दिसतात. यामागे राजकीय दबाव, तपास यंत्रणांचा वापर आणि सत्तेच्या समीकरणांची भीती असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सातत्याने होत असते. विरोधी पक्षांतील अनेक नेत्यांवर ईडी, सीबीआय किंवा अन्य तपास यंत्रणांच्या कारवायांचा दबाव वाढत असल्याची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे विरोधकांचा आवाज कमकुवत होत चालल्याचे दिसते. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी विजयी झाल्या असत्या तर राष्ट्रीय विरोधी राजकारणाचे नेतृत्व त्यांच्या हातात जाण्याची शक्यता होती. 'इंडिया आघाडी'तील अनेक पक्ष त्यांच्याकडे पर्याय म्हणून पाहत होते. परंतु पराभवानंतर त्यांच्या नेतृत्वाभोवती निर्माण होणारे वलय कमी झाले आहे. तामिळनाडूमध्ये द्रमुकला बसलेला धक्का, आसाममध्ये काँग्रेसचा पराभव आणि डाव्या पक्षांचे जवळपास संपुष्टात आलेले अस्तित्व यामुळे विरोधकांची एकूण ताकद कमी झालेली दिसते. डाव्या पक्षांची अवस्था तर अधिक चिंताजनक आहे. एकेकाळी राष्ट्रीय धोरणांवर प्रभाव टाकणारे डावे पक्ष आज कोणत्याही राज्यात सत्तेवर नाहीत. त्यामुळे त्यांनी स्वतंत्र राजकीय महत्त्वाकांक्षा बाजूला ठेवून व्यापक विरोधी एकजुटीसाठी काँग्रेसच्या नेतृत्वाला पाठिंबा देणे ही काळाची गरज ठरू शकते. भारतीय लोकशाहीत सक्षम विरोधी पक्ष असणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच प्रभावी सत्ताधारी पक्ष असणेही आवश्यक आहे. विरोधक दुर्बल झाले तर लोकशाहीतील संतुलन बिघडण्याचा धोका निर्माण होतो. विरोधकांसमोर आणखी एक मोठे आव्हान म्हणजे जनतेशी तुटलेला संवाद. निवडणुकीतील पराभवानंतर अनेक विरोधी पक्ष बचावात्मक भूमिकेत गेलेले दिसतात. महागाई, बेरोजगारी, शेतकरी प्रश्न, सामाजिक तणाव यांसारख्या मुद्द्यांवर सातत्याने जनआंदोलन उभे करण्यात त्यांना अपयश येत आहे. अनेकदा विरोधकांची एकजूट ही केवळ निवडणुकीपुरती मर्यादित असल्याचे दिसते. सत्तेविरोधी मतांचे संघटन करण्यासाठी सातत्यपूर्ण जनसंपर्क, स्पष्ट धोरण आणि परस्परांतील विश्वास आवश्यक असतो. तो अद्याप निर्माण झालेला दिसत नाही. काँग्रेसनेही आपल्या मर्यादा ओळखून नव्या पिढीतील नेतृत्वाला संधी देणे, प्रादेशिक पक्षांशी लवचिक भूमिका घेणे आणि स्थानिक वास्तव समजून घेणे आवश्यक आहे. तामिळनाडूमध्ये विजय यांच्या पक्षाशी युती करण्याची शक्यता असताना ती साधता आली नाही, हे विरोधकांच्या रणनीतीतील कमकुवतपणाचे उदाहरण मानले जात आहे. केवळ भाजपविरोधी भूमिका घेऊन जनतेचा विश्वास संपादन करता येणार नाही; त्यासाठी ठोस विकासदृष्टी, सक्षम नेतृत्व आणि विश्वासार्ह पर्याय आवश्यक आहे.ङ्गभारतीय लोकशाहीची खरी ताकद तिच्या विविधतेत आहे. प्रादेशिक पक्षांनी अनेकदा स्थानिक प्रश्नांना राष्ट्रीय पातळीवर स्थान मिळवून दिले. भाषिक, सांस्कृतिक आणि प्रादेशिक अस्मिता जपण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. त्यामुळे प्रादेशिक पक्षांचे पूर्णतः अस्तित्व संपुष्टात येणे हे लोकशाहीच्या दृष्टीने आदर्श चित्र ठरणार नाही. मात्र बदलत्या राजकीय वास्तवात टिकून राहण्यासाठी त्यांना स्वतःची भूमिका नव्याने निश्चित करावी लागेल.

आजची राजकीय परिस्थिती विरोधकांसाठी धोक्याची घंटा असली तरी ती संधीही आहे. एकत्रित नेतृत्व, स्पष्ट राष्ट्रीय दृष्टिकोन आणि जनतेच्या प्रश्नांशी जोडलेली राजकीय चळवळ उभारण्यात विरोधक यशस्वी झाले तर देशात पुन्हा एकदा सक्षम द्विपक्षीय स्पर्धा निर्माण होऊ शकते. अन्यथा भारतीय राजकारण एका पक्षाच्या वर्चस्वाकडे झुकण्याची शक्यता नाकारता येणार नाही. लोकशाहीचे आरोग्य टिकवण्यासाठी सक्षम सत्ताधारी पक्षाइतकाच सक्षम विरोधी पक्षही आवश्यक असतो, हे वास्तव सर्व राजकीय पक्षांनी ओळखण्याची हीच योग्य वेळ आहे.

# नेत्यांच्या कुरघोड्यांत बीडचा शेतकरी वाऱ्यावर!

## हक्काचा पिक विमा अन् विकासासाठी आता पुन्हा पंकजा मुंडेंचीच गरज

पाटोदा । प्रतिनिधी

एकेकाळी विकासाच्या मुद्द्यावर राज्यात आघाडीवर असलेला बीड जिल्हा सध्या जातीपातीच्या राजकारणात आणि नेत्यांच्या अंतर्गत कुरघोडीत भरडला जात आहे. जिल्ह्याची ही विस्कळीत झालेली घडी पुन्हा बसवण्यासाठी पंकजा मुंडे यांनीच जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वीकारावे, अशी आग्रही मागणी आता सर्वसामान्य जनतेतून, विशेषतः शेतकरी वर्गातून होत आहे.पिक विम्याचा तो 'पाच वर्षांचा' सुवर्णकाळ!जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मते, पंकजा मुंडे पालकमंत्री असताना २०१४ ते २०१९ या पाच वर्षांच्या काळात बीड जिल्ह्याला सलग आणि विक्रमी पिक विमा मिळाला होता. पंकजाताईंच्या कार्यकाळात विमा कंपन्यांवर प्रशासनाचा वचक होता, ज्यामुळे नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांच्या खात्यात वेळेवर पैसे जमा होत होते. मात्र, त्यानंतरच्या काळात जिल्ह्याला पिक विम्याच्या बाबतीत मोठा संघर्ष करावा लागला. ''ताई असताना हक्काचा विमा मिळत होता, आता मात्र फक्त आश्वासनं मिळतात,'' अशी खंत शेतकरी व्यक्त करत आहेत.जातीयवादाचे ग्रहण आणि विकासाची पीछेहाटदुर्दैवाने, गेल्या काही काळात बीड जिल्हा विकासाऐवजी जातीय वादाच्या आणि हिंसक वळणांच्या चर्चांमुळे जास्त गाजला. राजकीय नेत्यांच्या आपापसातील हेवेदावे आणि वर्चस्वाच्या लढाईत सर्वसामान्य जनतेचे प्रश्न अधांतरी राहिले आहेत. जिल्हा विकासाच्या मुख्य प्रवाहातून मागे पडत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. अजितदादा पवार पालकमंत्री म्हणून लाभले तेव्हा जिल्ह्याला मोठी अपेक्षा होती; मात्र दुर्दैवाने त्यांच्या अपघाती निधनामुळे जिल्ह्याचे मोठे नुकसान झाले. सध्या सुनेत्रा पवार यांच्याकडे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद असून, प्रशासकीय सातत्य राखण्याचा प्रयत्न सरकारकडून होत आहे.सुरेश धस यांच्याकडूनही मोठ्या अपेक्षाजिल्ह्यातील सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्यासाठी दमदार नेतृत्वाची गरज आहे. अशातच आमदार सुरेश धस यांच्याकडे शेतकरी मोठ्या आशेने पाहत आहेत. सुरेश धस यांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी असलेले जवळचे संबंध जिल्ह्यासाठी फायदेशीर ठरू शकतात. ''धस साहेबांनी जर मुख्यमंत्र्यांकडे शब्द टाकला, तर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पदरात मोठी मदत पडू शकते,'' असा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये आहे.नेत्यांच्या कुरघोड्या आणि शेतकऱ्यांची ओरडजिल्ह्यातील बड्या नेत्यांना एकमेकांवर टीका करण्यातून आणि राजकारण करण्यातून वेळ मिळत नसल्याने, शेतकऱ्यांकडे लक्ष द्यायला कोणाकडेही वेळ नाही, अशी स्थिती आहे. अशा परिस्थितीत जिल्ह्याला एका खंबीर पालकाची गरज आहे, जो जातीपातीचे राजकारण बाजूला ठेवून सर्वांना सोबत घेऊन चालेल. पंकजा मुंडे यांचे वजन पाहता, त्यांनी पुन्हा एकदा जिल्ह्याची धुरा हाती घ्यावी, यासाठी जिल्ह्याचा कानाकोपरा साद घालत आहे.

# महामोर्चास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे–मिलिंद सरपते

बीड । प्रतिनिधी

**अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या विरोधात सोमवार दि. ११ मे रोजी सकाळी ११ वाजता बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आंबेडकरी समाजाच्या वतीने भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या महामोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते मिलिंद सरपते यांनी केले आहे.**



बीड येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत आंबेडकरी समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी राज्य शासनाच्या उपवर्गीकरण प्रक्रियेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. भाजप सरकार समाजात फूट पाडण्याचे काम करत असून अनुसूचित जातींमध्ये नवीन वाद निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. हा मोर्चा कोणत्याही जातीविरोधात नसून शासनाच्या धोरणाविरोधात असल्याचे स्पष्ट करण्यात आले. पत्रकार परिषदेत बोलताना पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, उपवर्गीकरणासंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या बदर समितीचा संपूर्ण अहवाल तात्काळ जनतेसमोर जाहीर करण्यात यावा. तसेच सूचना व हरकती सादर करण्यासाठीची मुदत ३० ऑगस्टपर्यंत वाढवावी. अनुसूचित जातीतील सर्व ५९ जातींची भूमिका जाणून घेण्यासाठी स्वतंत्र संयुक्त समिती स्थापन करण्याची मागणीही करण्यात आली. यावेळी जातीनिहाय जनगणना करण्यात यावी, कंत्राटी व गुत्तेदार पद्धतीची नोकरभरती बंद करून नियमित पदभरतीद्वारे अनुसूचित जाती-जमातींचा अनुशेष भरून काढावा, तसेच शिक्षणाचे राष्ट्रीयीकरण करून सर्वांसाठी समान, मोफत व सक्तीचे शिक्षण लागू करावे, अशा विविध मागण्या पत्रकार परिषदेत मांडण्यात आल्या. ''हा महामोर्चा कोणत्याही समाजविरोधात नसून संविधान, सामाजिक ऐक्य आणि आंबेडकरी समाजाचे हक्क वाचवण्यासाठी आहे. त्यामुळे नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,'' असे आवाहन मिलिंद सरपते यांनी केले.

# लिंबागणेश मुख्यचौक पुन्हा रक्तरंजित; गतिरोधकाअभावी अपघातांची मालिका सुरूच

लिंबागणेश । प्रतिनिधी

**बीड तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी अहमदपूरअहिल्यानगर मार्गावरील लिंबागणेश येथील मुख्यचौकात काल दि.०८ शुक्रवारी रात्री सुमारे पाऊणे नऊ वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात घडला. बजाज कंपनीची डिस्कवर दुचाकी आणि सुझुकी कंपनीची स्विफ्ट कार यांच्यात जोरदार धडक होऊन दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. अपघातात त्याच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून घटनास्थळी रक्ताचा सडा पडला होता.**



स्थानिक नागरिक व प्रत्यक्षदर्शींनी तत्काळ धाव घेत जखमी युवकाला रुग्णवाहिकेद्वारे बीड येथील रुग्णालयात उपचारासाठी हलविले. सुदैवाने या अपघातात जीवितहानी टळली असली तरी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, लिंबागणेश मुख्यचौकात वारंवार होत असलेल्या अपघातांमुळे डॉ . गणेश ढवळे आणि हरिओम क्षीरसागर यांच्या पुढाकाराने ग्रामस्थांनी अनेक वेळा आंदोलन करून गतिरोधक बसविण्याची मागणी केली होती. ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर दि.२६ जुन २०२५ रोजी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि रस्ता सुरक्षा समितीचे सचिव कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग बीड रविंद्र तोंडे यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी केली होती. या अनुषंगाने त्यांच्या अहवालानंतर जिल्हाधिकारी तथा रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष विवेक जॉन्सन यांनी ६ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना संबंधित ठिकाणी गतिरोधक उभारण्याचे लेखी आदेश दिले होते. मात्र, आदेशानंतर तब्बल ६ महिने उलटूनही विभागाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे ''जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशालाच जाणीवपूर्वक केराची टोपली दाखवली जात आहे का?'' असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. 'या चौकातून दररोज शाळकरी विद्यार्थी, नागरिक आणि वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. प्रशासनाने वेळीच उपाययोजना न केल्यास भष्यात मोठी जीवितहानी होऊ शकते. त्यास जिल्हा प्रशासन आणि विभाग जबाबदार राहील,'' असा संतप्त इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# पान १ वरून...

## कृषी विभागाची धडक मोहीम

विभागात प्रत्येकी १ गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. कृषी विभागाने केवळ दुकानदारांवरच नव्हे, तर संशयास्पद प्रमाणात खत खरेदी करणाऱ्या शेतकऱ्यांवरही लक्ष केंद्रित केले आहे. २० पेक्षा अधिक युरियाच्या गोण्या खरेदी करणाऱ्या १७ हजार शेतकऱ्यांची यादी तयार करण्यात आली असून, त्यापैकी ११ हजार २६ शेतकऱ्यांची तपासणी पूर्ण झाली आहे. यामध्ये १ हजार ४४८ शेतकऱ्यांना गरजेपेक्षा अधिक खत खरेदी केल्याप्रकरणी नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. शेतीसाठीचा युरिया औद्योगिक वापरासाठी वळविला जात असल्याच्या संशयावरून १५३ औद्योगिक प्रकल्पांचीही तपासणी करण्यात आली. यापैकी २४ ठिकाणचे नमुने ताब्यात घेण्यात आले असून, दोन ठिकाणी युरियाचा अतिरिक्त वापर झाल्याचे निष्पन्न झाले आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर ही मोहीम आणखी तीव्र करण्यात येणार असून, शेतकऱ्यांच्या हक्काचे खत काळाबाजारात विकणाऱ्या किंवा साठेबाजी करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा कृषी विभागाने दिला आहे.

------------

## दैनंदिन वस्तू महागणार!

पहिल्या तिमाहीत (एप्रिल-जून) कंपनी पुन्हा दरवाढ करू शकते. यापूर्वीच डाबरने सुमारे चार टक्के किंमतवाढ केली असली तरी कच्च्या मालाच्या खर्चात सातत्याने वाढ होत असल्याने आणखी वाढ अपरिहार्य ठरत आहे. इराण-अमेरिका संघर्ष आणि हॉर्मुझ सामुद्रधुनीभोवती निर्माण झालेल्या तणावामुळे जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या पुरवठ्याबाबत चिंता वाढली आहे. हॉर्मुझ मार्गातून जगातील सुमारे २० टक्के तेल आणि वायू पुरवठा होतो. त्यामुळे या मार्गावरील अडथळ्यांचा थेट परिणाम इंधन, वाहतूक आणि उत्पादन खर्चावर होत आहे. कच्च्या तेलाच्या दरवाढीमुळे वाहतूक, प्लास्टिक पॅकेजिंग, रसायने आणि लॉजिस्टिक्सचा खर्च वाढतो. त्यामुळे एफएमसीजी कंपन्यांच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ होत असून, त्याचा भार ग्राहकांवर टाकण्याची वेळ कंपन्यांवर आली आहे. गेल्या तीन महिन्यांत सोयाबीन तेल, शेंगदाणा तेल आणि मोहरी तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात क्रूड ऑइलसह युरिया, ॲल्युमिनियम आणि खाद्यतेलांचे दरही झपाट्याने वाढले आहेत. त्यामुळे उत्पादन खर्च आणखी वाढला आहे. दरम्यान, ग्रामीण भागातील मागणीत सुधारणा झाल्याचे कंपन्यांनी म्हटले आहे. छोट्या शहरांमध्ये आणि गावांमध्ये विक्री वाढू लागली आहे. मात्र, मागणी वाढत असतानाच कच्च्या मालाच्या किमती वाढल्याने कंपन्यांच्या नफ्यावर दबाव निर्माण झाला आहे. उद्योग तज्ज्ञांच्या मते, मान्सून अपेक्षेपेक्षा कमी राहिला आणि पश्चिम आशियातील तणाव कायम राहिला, तर आगामी महिन्यांत घरगुती खर्चात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

-------------

## अधिकार नसताना सुनावणी घेतली,

पथकाने त्यांना लातूर येथून शुक्रवारीच अटक केली होती आणि या कारवाईनंतर दुसऱ्याच दिवशी न्यायालयाचा हा दुसरा मोठा दणका त्यांना बसला आहे. या संपूर्ण प्रकरणाची मूळ पार्श्वभूमी अशी की, कळंब येथील उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी २८ ऑगस्ट २०१७ रोजी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४५ अंतर्गत एका दाव्यावर कायदेशीर आदेश काढला होता. या निर्णयाच्या विरोधात काही प्रतिवादींनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम २५७ चा आधार घेत तत्कालीन अपर जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याकडे दाद मागितली होती. यावेळी कायद्याचा कोणताही अधिकार नसताना, अविनाश पाठक यांनी या प्रकरणावर सुनावणी घेतली आणि उपविभागीय दंडाधिकाऱ्यांचा तो मूळ आदेश पूर्णपणे रद्दबातल ठरवला. या अधिकाराबाहेरील बेकायदेशीर निर्णयाला द्वारकाबाई सुधाकर कोठावळे यांनी उच्च न्यायालयात एका रिट याचिकेद्वारे आव्हान दिले होते. या याचिकेवर सविस्तर सुनावणी करताना न्यायालयाने स्पष्ट केले की, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १४५ अंतर्गत दिलेल्या आदेशाला जर आव्हान द्यायचे असेल, तर कलम ३९७ नुसार सक्षम न्यायालयात रीतसर पुनरीक्षण अर्ज दाखल करणे हाच एकमेव कायदेशीर मार्ग आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेचे कलम २५७ अपर जिल्हाधिकाऱ्यांना अशा प्रकारच्या फौजदारी आदेशांवर सुनावणी घेण्याचा कोणताही अधिकार प्रदान करत नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आणि अविनाश पाठक यांचा आदेश रद्द केला. कायदेशीर प्रक्रियेचे उल्लंघन केल्याच्या या प्रकरणात याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. विक्रम उंद्रे यांनी न्यायालयात खंबीरपणे बाजू मांडली तर सरकारी पक्षाच्या वतीने बी. ए. शिंदे यांनी काम पाहिले.

-------------

## शुभेंदू अधिकारी पश्चिम बंगालच्या

रवाना झाले. यावेळी मोदींनी श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या सहकाऱ्यांचे आशीर्वाद घेतले, तसेच अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांचीही भेट घेतली. या सोहळ्याला गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, नितीन नवीन, योगी आदित्यनाथ यांच्यासह महाराष्ट्रातून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अनेक दिग्गज नेते उपस्थित होते. सुमारे २० राज्यांचे मुख्यमंत्री या सोहळ्याचे साक्षीदार बनले. शुभेंदू अधिकारी हे पश्चिम बंगालचे ९ वे मुख्यमंत्री बनले आहेत.

------------

## सदावर्तेंच्या ताफ्यावर मनसैनिकांनी

या शब्दाचा वापर एखाद्या करारासाठी किंवा कटासाठी केला जातो, त्यावरूनच उपरोधिकपणे हा प्रकार करण्यात आल्याची चर्चा आहे. गेल्या काही दिवसांपासून गुणरत्न सदावर्ते आणि मनसे यांच्यात मराठी सक्तीच्या मुद्द्यावरून जोरदार वाद सुरू आहे. मुंबईतील रिक्षा-टॅक्सी चालकांवर मराठी भाषेची सक्ती करण्याच्या विरोधात सदावर्तेंनी घेतलेल्या भूमिकेमुळे मनसे आक्रमक झाली होती. राज ठाकरे यांच्यावर सदावर्तेंनी केलेल्या टीकेचा बदला म्हणून हा हल्ला केल्याचे मनसे कार्यकर्त्यांकडून सांगितले जात आहे. या घटनेनंतर पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली. हल्ला करणाऱ्या काही मनसे कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अशा हल्ल्यांनी मी घाबरणारा नाही, मी संविधानाच्या चौकटीत राहून माझे काम करत राहीन. लोकशाहीत विचार मांडण्याचा अधिकार सर्वांना आहे, पण अशा प्रकारे गुंडगिरी करणे चुकीचे आहे, अशी प्रतिक्रिया गुणरत्न सदावर्ते यांनी या घटनेनंतर दिली. यापूर्वीही जालन्यात सदावर्तेंच्या गाडीवर मराठा आंदोलकांनी दगडफेक केल्याची घटना घडली होती. मात्र, आजच्या या 'शाई आणि सुपारी' हल्ल्यामुळे जालन्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे.

---------------

## विदर्भ, मराठवाडा आणि मध्य

करण्यात आली आहे. तर मध्य महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सोलापूर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडटासह वादळी वारे आणि मध्यम पावसाचा इशारा हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे. अहिल्यानगर, सातारा, आणि पुणे जिल्ह्यात हलक्या सरी हजेरी लावण्याची शक्यता आहे. मराठवाड्यातील नांदेड, लातूर, धाराशिव जिल्ह्यात विजांसह वादळी पावसाची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे. तर बीड, हिंगोली जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलक्या सरी हजेरी लावतील, असा अंदाज आहे. विदर्भातील अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडटासह वादळी वारे आणि मध्यम पावसाचा इशारा हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. मध्य प्रदेशापासून विदर्भ, मराठवाडा आणि कोमोरीन भागापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. तसेच अरबी समुद्राकडून येणाऱ्या आर्द्र वाऱ्यांमुळे विदर्भ, मराठवाडा आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रात ढगाळ हवामान, मेघगर्जना आणि हलक्या ते मध्यम पावसासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे.

---------

## ११ वी ऑनलाईन प्रवेशासाठी

विद्यार्थ्यांनी https://mahafyjcadmissions.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध माहिती व सूचनांनुसार ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन शिक्षण संचालनालयाने केले आहे. प्रवेश प्रक्रियेमध्ये तीन नियमित फेऱ्या, ओपन टू ऑल चौथी फेरी, मुलींकरीता विशेष पाचवी फेरी घेण्यात येत आहे. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवेशासाठी ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. शून्य फेरी मध्ये ८ ते २० मे या कालावधीत विद्यार्थ्यांना नोंदणी व अर्जाचा भाग १ ऑनलाईन सादर करणे, तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे, हरकती/ दुरुस्ती मागण्या, सर्वसाधारण गुणवत्ता यादी अंतिम करणे, विविध कोट्यासाठी यादी देऊन रिक्त जागा प्रत्यार्पित करणे तसेच पहिल्या फेरीकरीता जागा प्रदर्शित करणे ही प्रक्रिया होईल. नियमित कॅप फेरी-१ अंतर्गत नवीन विद्यार्थ्यांची नोंदणी, भाग-१ मधील दुरुस्ती तसेच भाग-२ भरण्याची प्रक्रिया २१ आणि २२ मे रोजी होईल. विद्यार्थ्यांना किमान एक आणि कमाल दहा कनिष्ठ महाविद्यालयांना पसंतीक्रम देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. कॅप फेरी-१ ची अलॉटमेंट प्रक्रिया २३ ते २६ मे दरम्यान पार पडणार असून, २६ मे रोजी प्रवेश वाटप यादी जाहीर करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगिनद्वारे प्रवेशासाठी वाटप झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती उपलब्ध होणार असून, एसएमएसद्वारेही संदेश पाठविण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेतील माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन शिक्षण संचालनालयामार्फत करण्यात आले आहे. प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी support@mahafyjcadmissions.in या ई-मेलवर संपर्क साधता येणार असून, ८५३०९५५५६४ हा हेल्पलाईन क्रमांकही उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**२९ मे रोजी रिक्त जागांची माहिती**

प्रवेश निश्चित करण्यासाठी विद्यार्थ्यांनी २६ ते २८ मे दरम्यान संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात उपस्थित राहून कागदपत्र पडताळणी व शुल्क भरण्याची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक राहणार आहे. त्यानंतर २९ मे रोजी रिक्त जागांची माहिती प्रसिद्ध करण्यात येणार असून, ३० मे रोजी दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर करण्यात येईल.

------------

## शरद पवार गटाच्या

संग्राम भंडारे आणि दहा ते पंधरा गोरक्षकांनी ही शाईफेक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. हवेली येथे प्रवचन संपल्यानंतर सकाळी दहा वाजताची ही घटना घडली. अंगावर शाही फेकत धक्काबुक्की करून पिस्तूल दाखवला असल्याचा आरोप विकास लवांडे यांनी केला आहे. काही दिवसांपूर्वी लवंडे यांनी वारकरी सांप्रदायातील घुसखोर म्हणत २० जणांची यादी जाहीर केली होती, या यादीवरुनच हा प्रकार घडल्याचे समोर आले आहे.

------------

## विद्यमान जिल्हाधिकाऱ्यांच्या तांत्रिक

मोबदला राष्ट्रीय महामार्गाच्या कार्यालयाकडून मिळाल्यानंतर त्यांनी ७२ कोटी रुपयांचे वितरणही करण्यात आले. या प्रकरणातील कागदपत्रातील अविनाश पाठक यांची स्वाक्षरी बनावट आहे की नाही याचा तपास करण्यासाठी हस्ताक्षर तज्ज्ञांची मदत घेण्यात आली. तसेच न्याय वैद्यक प्रयोगशाळेकडून आलेल्या अहवालानंतर अविनाश पाठक यांना चौकशीसाठी प्रश्नावली पाठविण्यात आली होती. या घोटाळ्यात तत्कालीन जिल्हाधिकरी पाठक यांचे नाव, पदनाम व स्वाक्षरी करून दि. १ मार्च २०२५ ते १७ एप्रिल २०२५ पर्यंतच्या १५४ बनावट आदेश निर्गमित करण्यात आले होते. यातील सर्व कागदपत्रे, दूरध्वनीवरील संभाषणासह, सर्व संचिका पोलिसांनी तपासल्यानंतर अविनाश पाठक यांना चौकशीसाठी ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. या भूसंपादन घोटाळ्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांसोबतच महसूल मधील एक टीम कार्यरत होती. यात काही वकील मंडळीचाही समावेश आहे. विशेष म्हणजे काही शेतकऱ्यांच्या नावावर वाढीव बिले ट्रान्सफर करून पुन्हा ती अधिकाऱ्यांनी घेतली असल्याचे बोलले जात आहे. सुरुवातीला आरोप झाले मात्र त्यानंतर या सह्या तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या नाहीत असे म्हटले गेले. त्यानंतर नूतन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तांत्रिक बाबी तपासल्या आणि गुन्हा दाखल केला. हा मोठा घोटाळा आहे आणि तो नूतन जिल्हाधिकाऱ्यांच्या अंगलट आला असता, मात्र त्यांनी तांत्रिक बाबी पूर्ण करत हा घोटाळा उघडकीस आणला. विवेक जॉन्सन हे यापूर्वी प्रशिक्षणार्थी कालावधीमध्ये माजलगाव नगरपालिकेचे सीओ होते त्या काळातही त्यांनी अशाच एका प्रकरणांमध्ये राजकीय व्यक्ती व तेथील पालिकेतील प्रतिनिधी यांच्यावर गुन्हे दाखल केले होते. आताही नूतन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तांत्रिक बाजू भक्कम केल्यामुळे तात्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना पोलीस कोठडीची हवा खावी लागत आहे. जिल्हाधिकाऱ्यांना अशा प्रकरणांमध्ये अटक होण्याची ही राज्यातील पहिलीच घटना असावी.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

रविवार, दि. १० मे २०२६



## थोडक्यात

### आकांक्षा सावंतचे दहावी परीक्षेत यश शाळेतून सर्वप्रथम



नवगण राजुरी :-खापरपांगरी येथील लोकमान्य टिळक माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु. आकांक्षा बप्पासाहेब सावंत हिने शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ५०० पैकी ४७४ गुण मिळवून विशेष प्राविण्यसह यश संपादन केले आहे.

बीड तालुक्यातील सौंदाना येथील बप्पासाहेब सावंत या शेतकऱ्याची कन्या आकांक्षा हिने विज्ञान विषयात- ९८, गणित- ९७, सामाजिकशास्त्र- ९३, मराठी- ९०, हिंदी- ८९, इंग्रजी- ८४ असे ९४.८०% गुण मिळून घवघवीत यश मिळविले आहे. तिने मिळवलेल्या यशाबद्दल तिचे शाळेच्या आणि ग्रामस्थांच्या वतीने कौतुक होत आहे.

### श्रेयश बनसोडेचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

बीड । प्रतिनिधी




स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, केज या शाळेचा विद्यार्थी चि. श्रेयश रघुनाथ बनसोडे याने शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९९.००% गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.

चि. श्रेयश रघुनाथ बनसोडे या विद्यार्थ्याने दहावीच्या परीक्षेत संस्कृत विषयात ९९, गणित आणि विज्ञान विषयात ९८, मराठी आणि विषयात ९१ तर सामाजिक शास्त्र ९४ असे एकूण ५०० पैकी ४९५ गुण मिळवून यश मिळविले आहे. त्याच्या यशाबद्दल शाळेचे शिक्षक, आणि नातेवाईकांनी कौतूक केले आहे.

### दहावीत ८९ टक्के गुण मिळवणाऱ्या सदफ शेख हिचा सत्कार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात शिक्षणाला प्रोत्साहन देणारा आणि सामाजिक बांधिलकी जपणारा एक प्रेरणादायी उपक्रम समोर आला आहे. आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याच्या शिक्षणात अडथळा येऊ नये, या उदात्त भावनेतून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा सार्वजनिक बांधकाम विभागातून सेवानिवृत्त झालेले राजेंद्र घोडके यांनी कौतुकास्पद निर्णय घेत समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे.



गांधीनगर येथील सदफ शेख हिने दहावीच्या परीक्षेत तब्बल ८९ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. फातिमा उर्दू माध्यमिक शाळा येथील विद्यार्थिनी असलेल्या सदफने शाळेत प्रथम क्रमांक पटकावत आपल्या कुटुंबासह शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. सदफच्या या यशाबद्दल राजेंद्र घोडके यांनी तिचा तसेच तिच्या आई-वडिलांचा विशेष सत्कार करून गौरव केला. यावेळी बोलताना त्यांनी सदफच्या पुढील शिक्षणाचा संपूर्ण खर्च स्वतः उचलण्याची घोषणा केली. उच्च शिक्षणासाठी तिचे पालकत्व स्वीकारत त्यांनी शिक्षणाला प्रोत्साहन देणारा समाजापुढे एक सकारात्मक आदर्श ठेवला आहे.

या निर्णयामुळे शेख कुटुंबीयांना मोठा आधार मिळाला असून परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सदफ शेख हिने आपल्या यशाचे श्रेय आई-वडिलांसह शिक्षकांना दिले. तसेच राजेंद्र घोडके यांच्यासारख्या सामाजिक कार्यकर्त्यांचा मिळालेला आधार आपल्यासाठी प्रेरणादायी असल्याची भावना तिने व्यक्त केली.

विशेष म्हणजे, आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये या भावनेतून राजेंद्र घोडके सातत्याने सामाजिक कार्य करत आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून समाजात सकारात्मक संदेश पोहोचत आहे. सदफ शेख हिच्या उज्ज्वल भविष्यासाठी नागरिकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# बळेवाडी तलावातून आ.धस यांच्या संकल्पनेतून 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेचा शुभारंभ

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील बाळेवाडी येथे मराठवाडा भूषण लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या संकल्पनेतून व नियोजनातून बळेवाडी येथील महाराष्ट्र शासनाच्या साठवण तलावामध्ये ''गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार'' या महत्त्वपूर्ण योजनेचा शुभारंभ शुक्रवार दि. ९ मे रोजी या योजनेचा शुभारंभ भारतीय जनता पार्टी प्रमुख गणेश शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. आमदार सुरेश धस यांनी या परिसरातील शेतकऱ्यांना या तलावातील गाळाचा लाभ मिळावा यासाठी''गाळमुक्त धरण,गाळयुक्त शिवार'' या योजनेसाठी पाठपुरावा करून या योजनेचा फायदा होणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या या योजनेमुळे तलावातील गाळ काढून पाणी साठवण क्षमतेत मोठी वाढ होणार आहे.तसेच तलावातील सुपीक गाळ मुरूम,चुनखडकयुक्त,अतिपावसामुळे खराब झालेल्या



तसेच नापीक जमिनीवर टाकल्यास जमिनीची सुपीकता वाढून शेती उत्पादनात मोठी वाढ होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

तलावातील गाळ पूर्णपणे काढल्यास सध्याच्या तुलनेत दुप्पट पाणी साठवण क्षमता वाढू शकते, असे गणेश शिंदे यांनी सांगितले.

बळेवाडी तलावातील गाळाचा लाभ बळेवाडी, पारगाव जोगेश्वरी, खडकत, सांगवी, वाळूज, टाकळसिंग आदी पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमास आष्टी तालुका दूध संघाचे संचालक चेअरमन गणेश मोकाशे,जलसंपदा विभागाचे सचिन आजबे, बळेवाडी साठवण तलावाचे व्यवस्थापक वसंत भोसले, निशांत जेवे, अशोक दिनकर भोसले,बद्रीनाथ भोसले, दिपक भोसले, सुरेश भोसले,वनविभाग कर्जतचे काकासाहेब भोसले,कल्याण झराड, सुदाम आजबे, लहू भोसले,नाना पोटफोडे, बारीकराव झराड,गणेश भोसले,देवीदास भोसले, गहिनाथ भोसले, रामदास भोसले, देवराव भोसले, पांडुरंग झराड, ज्ञानेश्वर झराड, संजय भोसले, बापूराव बळे, बापू काशीनाथ भोसले, राजेंद्र निगुडे यांच्यासह पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराणी ताराबाई माध्यमिक विद्यालयची निकालाची परंपरा कायम


### आर्या मुरकुटे ९४.४० गुण घेऊन सर्वप्रथम, श्रावणी सोळुंके ९३.२० गुण घेऊन व्दितीय, रोहित शिंदे ९२.८० % गुण घेऊन तृतीय क्रमांक

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने मार्च-२०२६ मध्ये घेतलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचा निकालात वडवणी शहरातील संस्कार शिक्षण मंडळ संचलित महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा ७७.५२ टक्के निकाल लागला असून प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी उज्वल यशाच्या निकालाची परंपरा विद्यालयाने कायम ठेवली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांनी मार्च -२०२६ मध्ये घेतलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल शुक्रवार दि.०८ मे २०२६ रोजी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला असून वडवणी शहरातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल ७७.५२ टक्के इतका लागलेला आहे माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इयत्ता दहावीच्या परीक्षसाठी एकूण २६७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी





२०७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

विद्यालयातून कु.आर्या मुरकुटे ९४.४० टक्के गुण घेऊन सर्व प्रथम तर कु.श्रावणी सोळुंके ९३.२० टक्के गुण घेऊन व्दितीय व चि. रोहित शिंदे ९२.८० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांक आला आहे. विशेष प्राविण्य गुण घेऊन २० विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण झाले आहेत तर ३९ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळवली आहे. सर्व यशस्वी व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे शाळेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार श्री.केशवराव आंधळे तसेच विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजय आंधळे, संस्थेचे अध्यक्ष अनिलदादा चोले,वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रणजीत धस,संस्थेचे संचालक इंजि.अशोक आंधळे व विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभा के.आंधळे / डोईफोडे मॅडम,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्री.डोईफोडे सर,१० वी बोर्ड परीक्षाविभाग प्रमुख श्री.ठोंबरे सर,वर्गशिक्षक श्री.घोळवे सर,श्री.मुंडे ए.बी.,श्री.गिलबिले सर ,श्री.समर्थ सर,श्रीमती फलके मॅडम,श्री.कुलकर्णी सर,श्री.चोले सर सर्व विषय शिक्षक यांच्यासह विद्यालयातील शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थी,पालक व मार्गदर्शक शिक्षक-शिक्षिकांचे कौतुक व अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## बीडमध्ये उपवर्गीकरण विरोधात आंबेडकरी समाजाचा महामोर्चा!




### भाजप सरकारने जाती-जातीत भांडणे लावू नयेत; ११ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा

बीड । प्रतिनिधी

देशात आणि राज्यात संघप्रणित भाजप सरकार सत्तेत आल्यापासून समाजामध्ये अस्थिरता निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. गुण्यागोविंदाने नांदणाऱ्या समाजाला एकमेकांच्या विरोधात उभे केले जात असून सामाजिक बंधुभाव धोक्यात आला आहे. अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा मुद्दा पुढे करून सरकारने समाजात नवीन वाद निर्माण केला असल्याचा आरोप आंबेडकरी समाजाच्या वतीने करण्यात आला. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण तात्काळ थांबवावे, अशी मागणी करत येत्या सोमवार दि. ११ मे रोजी सकाळी ११ वाजता बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. बीड शहरातील शासकीय विश्रामगृह येथे शनिवारी (दि.९) आयोजित पत्रकार परिषदेत आंबेडकरी समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी ही भूमिका स्पष्ट केली. हा मोर्चा अनुसूचित जातीतील कोणत्याही जातीविरोधात नसून केवळ सरकारच्या धोरणाविरोधात असल्याचे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. पत्रकार परिषदेत बोलताना पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणासंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या बदर समितीचा संपूर्ण अहवाल तात्काळ जनतेसमोर जाहीर करण्यात यावा. अहवाल सार्वजनिक झाल्यानंतरच नागरिकांना त्यावर सूचना, हरकती आणि मते प्रभावीपणे मांडता येतील. तसेच एप्रिल महिना हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा असल्यामुळे राज्यभर विविध कार्यक्रम सुरू असतात. त्यामुळे जनतेला पुरेसा वेळ मिळण्यासाठी सूचना व हरकती सादर करण्याची मुदत ३० ऑगस्टपर्यंत वाढवावी, अशी मागणी करण्यात आली. अनुसूचित जातीतील सर्व ५९ जातींची भूमिका जाणून घेण्यासाठी लेखक, साहित्यिक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते आणि समाजनेते यांचा समावेश असलेली स्वतंत्र संयुक्त समिती स्थापन करावी. सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला उपवर्गीकरण करणे बंधनकारक केलेले नसल्याने जनभावना लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने ही प्रक्रिया तात्काळ थांबवावी, असेही यावेळी सांगण्यात आले. यासोबतच राज्यातील सर्व समाजघटकांची अचूक माहिती मिळण्यासाठी जातीनिहाय जनगणना करण्यात यावी, शासकीय सेवेत सुरू असलेली कंत्राटी व गुत्तेदार पद्धतीची नोकरभरती बंद करून नियमित पदभरतीद्वारे अनुसूचित जाती-जमातींचा अनुशेष भरून काढावा, तसेच शिक्षणाचे राष्ट्रीयीकरण करून सर्वांसाठी समान, मोफत आणि सक्तीचे शिक्षण लागू करावे, अशा विविध मागण्या पत्रकार परिषदेत राजू जोगदंड, ॲड.भगवान कांडेकर, अजय सरवदे, सिद्धार्थ शिनगारे, आशिषकुमार चव्हाण, नितीन सोनवणे, पुरुषोत्तम वीर, ॲड.राजेश शिंदे, प्रेम कांबळे, रजनिकांत वाघमारे, सूर्यकांत ठोकळ, लखन जोगदंड, मिलिंद सरपते, श्यामसुंदर जाधव, प्रविण टाकणखार यांनी मांडल्या.

## शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाची दहावीच्या परीक्षेत यशाची परंपरा कायम

### श्रेयश जाधव प्रथम, भक्ती गोरे द्वितीय तर यशराज आनेराव तृतीय

बीड । प्रतिनिधी

बीड शहराजवळील शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाने यंदाच्या दहावीच्या परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करत यशाची परंपरा कायम राखली आहे. मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र(एस.एस.सी.) परीक्षेचा निकाल आज दिनांक ८ मे रोजी जाहीर झाला. यामध्ये विद्यालयाचा शेकडा ९० टक्के निकाल लागला आहे. या परीक्षेत चि. श्रेयश नवनाथ जाधव याने ९६.२० टक्के गुण मिळवत विद्यालयातुन प्रथम क्रमांक पटकावला. कु. भक्ती विलास गोरे हिने ९४.४० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला, तर चि. यशराज गणेश आनेराव याने ९३.०० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक संपादन करत श्री महालक्ष्मी विद्यालयाच्या यशात मानाचा तुरा रोवला.

तसेच कु. स्नेहल कमलाकर शिंदे हिने ९०.४० टक्के, चि. गौरव गणेश साळुंके याने ९०.२० टक्के, चि. मेघराज हौसराव मोरे याने ८९.०० टक्के, चि. रेहान शरीफ शेख याने ८८.६० टक्के, कु. जान्हवी बदाम पदमुले व कु. अमृता बाबू पाखरे यांनी प्रत्येकी ८५.६० टक्के, चि. रविराज पांडुरंग गावडे याने ८५.०० टक्के, चि. तानाजी सुभाष काळे याने ८३.०० टक्के गुण मिळवत विशेष यश संपादन केले.

याशिवाय कु. श्रुती भाऊसाहेब कदम



(८१.२०), चि. दीपक जयसिंग पाखरे (८०.६०), चि. नयन नथाराम घोडके (८०.६०), चि. कृष्णा राजेभाऊ सिरसाट (८०.२०), कु. अमृता रामप्रसाद साळुंखे (७९.८०), कु. आरोही अतुल भडगळे (७७.००), चि. ओंकार श्रीकृष्ण शिंदे (७५.६०), कु. रुपाली सचिन थोरात (७५.६०), कु. अलिशा असीम शेख (७४.४०), कु. रुपाली जालिंदर काळे (७४.४०), कु. ऋतुजा विठ्ठल पिंगळे (७३.८०), कु. प्रज्ञा सुनील पाखरे (७३.२०), चि. रोहन अशोक चव्हाण (७१.८०), चि. गणेश बाळू कुर्टे (७१.४०), कु. दिव्यानी राहुल डोंगरे (७०.६०), चि. गोविंद सचिन यादव (६९.६०) आणि चि. शिवम रंजीत कदम (६९.२०) यांनी ही उल्लेखनीय यश संपादन केले. या विद्यालयातून विशेष प्राविण्यसह २० विद्यार्थी, प्रथम श्रेणी मध्ये २० विद्यार्थी आणि द्वितीय श्रेणी मध्ये ०६ उत्तीर्ण झाले आहेत. एकंदरीतच विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळवत शाळेच्या गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल यशामुळे शिदोड आणि परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून पालकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. सर्व गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचे शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती सुदामतीताई वाघ, संस्थेचे अध्यक्ष श्री. गणेश वाघ, सचिव श्री. नामदेवराव वाघ, शाळेचे मुख्याध्यापक श्री. दत्तात्रय चव्हाण सर, श्री. आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती साळुंके मॅडम, श्रीमती सानप मॅडम यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक आणि शिक्षणप्रेमी नागरिकांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## छत्रपती शिवाजी विद्यालयाचे दहावी बोर्ड परीक्षेत यश

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी - मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परीक्षेत येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले असून शाळेचा निकाल ६६.२६ टक्के लागला आहे.

शाळेची विद्यार्थीनी सय्यद मारिया गुलाब ८२ टक्के गुण घेऊन प्रथम, गायत्री भागवत भोसले ७८.४० टक्के गुण घेऊन द्वितीय तर सृष्टी विजय गंधनवार ७४. ४० टक्के गुण मिळवून तृतीय आली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार राधाकृष्ण पाटील, सतीश दुगड, सचिव माजी नगराध्यक्ष अशोक होके पाटील, ईनायत खान पठाण, डॉ. योगिता होके पाटील, अभय होके पाटील, मुख्याध्यापक मनोज सोळंके, भास्कर पारगावकर , बालासाहेब झोडगे, विष्णू गडकर, मुरलीधर भाळशंकर, आप्पासाहेब होके, माधव घोलप, अनंत शेजुळ, अनंत राठोड, सय्यद गयास, दत्तात्रय इंगळे, मिलिंद देशपांडे, सत्यप्रिया होके पाटील, फरजाना पठाण, तुळशीराम साळवे, पंकज कळसकर, शेख शहानुर, ज्ञानेश्वर पवार, स्मिता डाके, शिल्पा शिनगारे, सारीका टाकणखार , प्रथमेश लांडगे, विशाल राजपूत, दत्ता पांडे, दिनकर काळे यांनी अभिनंदन केले आहे.

# डॉ.अजय धोंडे यांची महेश सहकारी साखर कारखाना चेअरमनपदी तर दादासाहेब जगताप यांची व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड

आष्टी । प्रतिनिधी

महेश सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदी डॉ. अजय दादा धोंडे यांची तर व्हाईस चेअरमनपदी दादासाहेब जगताप यांची बिनविरोध निवड झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. निवड प्रक्रियेनंतर उपस्थित संचालक मंडळ, सभासद व कार्यकर्त्यांनी जल्लोष करत नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

ही निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी भारती ठाकूर प्रादेशिक उप संचालक साखर छत्रपती संभाजी नगर, सहाय्यक निवडणूक अधिकारी बाळकृष्ण शिंदे सहायक निबंधक अहिल्या नगर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. निवड प्रक्रिया शांततापूर्ण आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

या निवडीनंतर कारखाना परिसरात अनेक मान्यवरांनी डॉ. अजय दादा धोंडे व दादासाहेब जगताप यांना शुभेच्छा देत आगामी काळात कारखान्याच्या प्रगतीसाठी उत्तम कार्य करण्याचा विश्वास व्यक्त केला.

यावेळी बोलताना माजी आमदार भीमरावजी धोंडे म्हणाले की, ''महेश सहकारी साखर कारखाना हा शेतकऱ्यांचा विश्वासाचा कारखाना आहे. शेतकरी हित डोळ्यासमोर ठेवून कारखान्याची वाटचाल सुरू आहे. नव्या संचालक मंडळाच्या माध्यमातून कारखान्याला अधिक सक्षम व प्रगत करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित जपणे, कारखान्याची आर्थिक घडी मजबूत करणे व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कारखान्याची प्रगती साधणे हेच आमचे उद्दिष्ट राहील. संचालक मंडळातील सर्व सदस्य अनुभवी असून त्यांच्या सहकार्यामुळे कारखाना नव्या



उंचीवर जाईल,'' असे त्यांनी सांगितले.

तसेच नवनिर्वाचित चेअरमन डॉ. अजय दादा धोंडे यांनी सर्व संचालक मंडळ, सभासद व कार्यकर्त्यांचे आभार मानले. ''माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवत शेतकरी, कामगार आणि सभासद यांच्या हितासाठी प्रामाणिकपणे काम केले जाईल. कारखान्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांना सोबत घेऊन पुढे जाऊ,'' असे त्यांनी सांगितले.

यावेळी नवनिर्वाचित संचालक मंडळातील सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

**नवनिर्वाचित संचालक मंडळ पुढीलप्रमाणे :**

मा. आ. श्री. भीमरावजी धोंडे साहेब, श्री. नियामत बेग साहेब, श्री. जगताप संभाजी महादेव, श्री. झगडे सतीश रभाजी, श्री. ॲड. निकाळजे रत्नदीप भिमराव, श्री. गणेश मारुतीराव सांगळे, श्री. शिंदे केशव मच्छिंद्र, श्री. चव्हाण झुंबर मारुती, श्री. कर्डिले बजरंग कोंडीबा, श्री. गावडे गजानन पांडुरंग, श्री. गर्जे शहादेव महादेव, श्री. विधाते उद्धव आनंदराव, श्री. खेडकर अशोक विष्णू, श्री. मोहोळकर तुकाराम रामू, श्री. मुंडे अंकुश चिंतामण, श्रीमती गोल्हार कांती संतोष, श्रीमती नन्नवरे उज्वला संजय, श्री. वाघुले बाबासाहेब गोरख, श्री. दिंडे सदाशिव केरू आदी उपस्थित होते यावेळी सूत्रसंचालन शिवाजी थोरवे आण्णा यांनी केले तर आभार नियमात बेग यांनी मानले

यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक गिरीश झगडे, चीप अकाउंटट सुरेश बोराटे , सोपानराव मुळे, नवनाथ भगत सुरक्षा अधिकारी, मुख्य शेतकी अधिकारी वीरेंद्र गर्जे, रवी भोजने सिव्हिल इंजिनियर, पांडुरंग गावडे माजी संचालक, चीफ केमिस्ट के.डी गर्जे,सभासद, शेतकरी, कार्यकर्ते व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### बीड जिल्हयातुन

तडजोडीने निकाली काढण्यात आली.

सदरील लोक न्यायालयाच्या यशस्वीतेसाठी डॉ.वहाब ए.सय्यद, सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्यासह बीड मुख्यालयातील सर्व न्यायिक अधिकारी, बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व सर्व पदाधिकारी तसेच वकील संघाचे सर्व सदस्य, जिल्हा सरकारी वकील व सर्व सरकारी अभियोक्ता तसेच जिल्हा न्यायालयाचे प्रबंधक एस.पी.झेंड, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधिक्षक एस.टी.शिंदे व इतर सर्व न्यायालयीन कर्मचारी वर्ग यांची लोकन्यायालयात प्रमुख उपस्थिती होती.न्यायालयीन कर्मचारी, बँक कर्मचारी, पोलीस कर्मचारी व इतर कार्यालयीन कर्मचारी यांनी लोकअदालत यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

### जन्मठेपेच्या गुन्ह्यात

अन्यायकारक ठरेल, असा युक्तिवाद बचाव पक्षाने केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर मा. जिल्हा न्यायालयाने प्रकरणातील उपलब्ध पुराव्यांचा विचार केला. सकृतदर्शनी ठोस पुराव्यांचा अभाव असल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने गणेश राठोड आणि रमेश राठोड यांचा दि.०६/०५/२०२६ रोजी जामीन अर्ज मंजूर केला आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे दोन्ही आरोपींच्या कारागृहातून मुक्ततेचा मार्ग मोकळा झाला आहे. आरोपीच्या वतीने ॲड तेजस नेहरकर यांनी काम पाहिले तर त्यांना ॲड. गौतम के. नाईकवाडे, ॲड. रविराज व्ही राठोड, ॲड. दत्ता अनंता केसकर, ॲड. सिकंदर यांनी सहकार्य केले.

### वडवणी येथे होणार

शेतकरी बांधवांना मुक्कामाची सोय उपलब्ध व्हावी तसेच शेतकऱ्यांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात,या उद्देशाने आमदार दादांनी मा.ना.श्री. जयकुमार रावल साहेब,पणन मंत्री,महाराष्ट्र राज्य यांची भेट घेऊन वडवणी येथे शेतकरी भवन मंजूर करून निधी उपलब्ध करून देण्याबाबत वेळोवेळी पत्राद्वारे मागणी केली होती.या दादांच्या दादांच्या सातत्यपूर्ण मागणीला यश मिळाले असून.वडवणी येथील शेतकरी भवन बांधकामासाठी १ कोटी ५२ लक्ष ८० हजार रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.या माध्यमातून परिसरातील शेतकरी बांधवांना मुक्काम,विश्रांती व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे.आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी सांगितले.

# कापसाच्या दरात मोठी वाढ: घेतली मोठी झेप

पुणे : राज्यातील कापूस बाजारात सध्या मोठी तेजी पाहायला मिळत आहे. अवघ्या आठ दिवसांत कापसाच्या दरात तब्बल १,००० प्रति क्विंटलची वाढ झाली असून काही बाजार समित्यांमध्ये कापसाला थेट ९,९५० रुपयांपर्यंत उच्चांकी दर मिळाला आहे.

कापूसबाजारात सध्या मोठी तेजी पाहायला मिळत असून शेतकऱ्यांसाठी दिलासादायक चित्र निर्माण झाले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडी, युद्धजन्य परिस्थिती आणि रुपयाच्या अवमूल्यनामुळे कापसाच्या दरात मोठी वाढ झाली आहे. राज्यातील काही बाजार समित्यांमध्ये कापसाला तब्बल ९,९५० रुपये प्रति क्विंटल इतका उच्चांकी दर मिळाला असून हा यंदाच्या हंगामातील सर्वोच्च दर मानला जात आहे. गत आठ दिवसांत कापसाच्या दरात तब्बल १,००० रुपये प्रति क्विंटलची वाढ नोंदवली गेली आहे. काही दिवसांपूर्वी सरासरी ८,००० रुपये दराने विकला जाणारा कापूस आता ९,००० रुपयांच्या पुढे गेला आहे. त्यामुळे बाजारात उत्साहाचे वातावरण आहे.




सध्या जागतिक बाजारात पॉलिस्टर फायबर महाग होत असल्याने सुती धागा आणि कापसाची मागणी वाढली आहे. त्याचबरोबर क्रूड ऑइलच्या वाढत्या किमतीमुळेही कापूस बाजाराला आधार मिळत आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक व्यापारात अस्थिरता निर्माण झाली असून त्याचा थेट परिणाम कृषी बाजारावर होत असल्याचे जाणकार सांगत आहेत. पूर्वी जागतिक बाजारात कापसाला ७२ ते ७४ सेंट प्रति पाऊंड दर मिळत होता. आता हा दर वाढून ९० ते ९२ सेंट प्रति पाऊंडपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे कापूस गाठीच्या किमतीतही मोठी वाढ झाली आहे. ४५ हजार रुपये असलेली कापसाची खंडी आता थेट ६२ हजार रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

दर वाढले; पण शेतकऱ्यांकडे मालच नाही

दरात मोठी वाढ होत असली तरी अनेक शेतकऱ्यांनी यापूर्वीच कापूस विकून टाकल्याने सध्या बाजारात मालाची कमतरता जाणवत आहे. दुसरीकडे

कापसाच्या दरात तेजी असताना सरकीच्या दरात मात्र घट झाली आहे. काही दिवसांपूर्वी ४,५०० रुपये प्रति क्विंटल असलेली सरकी आता ४,३०० रुपयांच्या घरात पोहोचली आहे. मात्र, रुई आणि सुताच्या वाढत्या मागणीमुळे कापसाला चांगला आधार मिळत असल्याचे दिसत आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८१८ : इंग्रज मराठे तह होऊन रायगड किल्ला इंग्रजांच्या ताब्यात
१८२४ : लंडनमधील नॅशनल गॅलरी सर्वसाधारण लोकांसाठी खुली करण्यात आली.
१८५७ : मिरज येथे पहिला भारतीय स्वातंत्र्य संग्रामाची पहिली ठिणगी पेटली.
१९०७ : स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामाचा सुवर्णमहोत्सव लंडनमधे साजरा केला.
१९०९ : सावरकरांनी ब्रिटिशांच्या आनंदोत्सवाला प्रत्युत्तर म्हणून लंडनच्या इंडिया हाऊसमध्ये १८५७ च्या वीरांचा गौरव करणारा समारंभ आयोजित केला. त्यात त्यांनी आपल्या भाषणात त्या संघर्षाला उघड उघड स्वातंत्र्यसमर म्हटले.
१९३७ : स्वातंत्र्यवीर सावरकर यांची रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून बिनशर्त मुक्तता.
१९४० : दुसरे महायुद्ध हिटलरने हॉलंड, बेल्जिअम आणि फ्रान्सवर आक्रमण केले.
१९४० : दुसरे महायुद्ध नेव्हिल चेम्बरलेनने राजीनामा दिल्यावर विन्स्टन चर्चिल युनायटेड किंग्डमच्या पंतप्रधानपदी.
१९६२ : मार्वल कॉमिक्सने द इक्रीडिबल हल्क या मासिकाचा पहिला अंक प्रकाशित केला.
१९७९ : मायक्रोनेशिया प्रजासत्ताक बनले.
१९८१ : फ्रान्सवा मितराँ फ्रान्सचे अध्यक्ष बनले.
१९८१ : मुंबईमध्ये प्रथमच रात्रीच्या वेळी पकाशझोतात क्रिकेट सामना खेळण्यात आला.
१९९३ : संतोष यादव हि दोनदा एव्हरेस्ट पर्वत सर करणारी पहिली भारतीय महिला ठरली.
१९९४ : दक्षिण आफ्रिकेचे पहिले श्वेतवर्णीय राष्ट्राध्यक्ष नोबेल पारितोषिक विजेते नेल्सन मंडेला यांनी देशाची सूत्र हाती घेतली.
१९९७ : ७.३ मेगावॅट भूकंपाच्या तीव्र धक्क्याने इराण मधील सुमारे १५६७ लोक ठार, २३०० लोक जखमी आणि ५०००० लोक बेघर झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२६५ : जपानचा सम्राट फुशिमी यांचा जन्म. (मृत्यू: ८ ऑक्टोबर १३१७)
१८५५ : भारतीय गुरु आणि शिक्षक युकतेश्वर गिरी यांचा जन्म. (मृत्यू: ९ मार्च १९३६)
१८८९ : स्वातंत्र्यवीर सावरकरांचे बंधू, कादंबरीकार नारायण दामोदर सावरकर यांचा जन्म.
१९०५ : गायक व संगीतकार पंकज मलिक यांचा जन्म. (मृत्यू: १९ फेब्रुवारी १९७८)
१९०९ : आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ग्रंथालयशास्त्रज्ञ, पद्मश्री, इंडियन नॅशनल सायंटिफिक डॉक्युमेंटेशन सेंटर चे पहिले संचालक बेल्लारी शामण्णा केशवन यांचा जन्म. (मृत्यू: १६ फेब्रुवारी २०००)
१९१४ : चित्रपट निर्माते ताराचंद बडजात्या यांचा जन्म. (मृत्यू: २१ सप्टेंबर १९९२)
१९१८ : रिसर्च अँड ॲनॅलेसिस विंग या भारतीय गुप्तचर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रामेश्वरनाथ काओ यांचा जन्म. (मृत्यू: २० जानेवारी २००२)
१९३१ : ज्येष्ठ गीतकार जगदीश खेबूडकर यांचा जन्म.
१९३७ : माणिक गोडघाटे उर्फ कवी ग्रेस, मराठी कवी
१९४० : प्रसिद्धी पराङ्मुख गीतकार व कवी माणिकराव गोडघाटे ऊर्फ ग्रेस यांचा जन्म. (मृत्यू: २६ मार्च २०१२)
१९८६ : बुद्धीबळपटू पेंड्याला हरिकृष्ण यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७७४ : फ्रान्सचा राजा लुई (पंधरावा) यांचे निधन. (जन्म: १५ फेब्रुवारी १७१०)
१८९९ : रँड वधाच्या प्रकरणी द्रविड बंधूंची हत्या केल्याबद्दल महादेव विनायक रानडे यांना फाशी.
१९८१ : विनोदी लेखक प्राध्यापक विमादि तथा विनायक माधव दीक्षित पटवर्धन यांचे निधन.
१९९८ : पत्रकार, समाजसेवक, लेखक, चरित्रकार, साधना मासिकाचे संपादक यदुनाथ दत्तात्रय थत्ते यांचे निधन. (जन्म: ५ ऑक्टोबर १९२२)
२००० : कवी नागोराव घन:श्याम तथा ना. घ. देशपांडे यांचे निधन. (जन्म: २१ ऑगस्ट १९०९)
२००१ : महाराष्ट्राचे १३ वे मुख्यमंत्री, हिमाचल प्रदेशचे राज्यपाल सुधाकरराव नाईक यांचे निधन. (जन्म: २१ ऑगस्ट १९३४)
२००२ : गीतकार सय्यद अख्तर हुसेन रिझवी ऊर्फ कैफी आझमी यांचे निधन. (जन्म: १४ जानेवारी १९१९)
२०१५ : भारतीय इतिहासकार, लेखक निनाद बेडेकर यांचे निधन. (जन्म: १७ ऑगस्ट १९४९)

# जाणून घ्या वासरांमधील उष्माघात




उष्माघात ही वासरांसाठी जीवघेणी स्थिती आहे. उष्माघातामुळे वासरांच्या शरीराचे तापमान त्याच्या सामान्य तापमानापेक्षा जास्त होते, त्यामुळे संपूर्ण शरीरातील कार्यप्रणाली नष्ट होऊ शकते. ताप हा जंतुसंसर्ग झाल्यामुळे येतो, तर उष्माघात जास्त तापमान, हवेतील आर्द्रता आणि हवा खेळती नसणे अशा कारणांमुळे होतो.

कारणे : वातावरणातील जास्त उष्णता. वासरांच्या शरीरातील तापमान नियंत्रित करणाऱ्या प्रक्रियेचा अभाव. हवेतील आर्द्रतेचे प्रमाण. गोठ्यामध्ये हवा खेळती नसणे. शरीरात पाण्याची पातळी घटल्यास घाम येणे, श्वासाद्वारे शरीराचे तापमान नियंत्रित करणे कठीण होते. वातावरणातील तापमान अचानक वाढल्यास, वासराच्या शरीराचे तापमान नियमित ठेवण्याची क्षमता कमी होते.

लक्षणे : अशक्तपणा जाणवतो.वासरे बसून असतात. वासरांची हालचाल मंदावते. शरीरातील ऊर्जेचा अभाव.वासरांची वाढ खुंटते. वासरांच्या हालचालींचा अभाव.श्वसन दर वाढतो. गंभीर परिस्थितीमध्ये वासरांचे तोंड उघडे राहते, तोंडातून जास्त लाळ गळते. घाम येतो, त्वचा कोरडी पडते. उष्णतेच्या तणावामुळे हृदयाचे ठोके वाढतात.स्नायूंचे आकुंचन होते.निदान : वासरांच्या शरीराचे तापमान मोजावे. त्वचेची घडी चाचणीद्वारे वासरांच्या शरीरातील पाण्याची पातळी (निर्जलीकरण) तपासली जाते. रक्त चाचणी.

उपचार, प्रतिबंधात्मक उपाय : गोठ्यात हवा खेळती असावी. वासरांना जास्त गर्दीत ठेवू नये. वासरांना नियमित चोवीस तास मुबलक प्रमाणात थंड आणि शुध्द पाणी द्यावे. सकाळी लवकर आणि संध्याकाळी उशिरा चारा द्यावा, जेणेकरून पचनाच्या प्रक्रियेतून निर्माण होणारी उष्णता कमी होते. आहारामध्ये जास्त प्रमाणात तंतूमययुक्त चाऱ्याचा समावेश टाळावा, कारण यामुळे उष्णता वाढते. पाण्यामध्ये इलेक्ट्रोलाइट्सचा समावेश करावा, जेणेकरून वासरांच्या शरीरातील पाण्याचे संतुलन टिकून राहील. वासरांना उष्माघात झाल्यास त्वरित त्याच्या डोक्यावर आणि मानेवर थंड पाणी टाकावे.अतिथंड पाण्याचा वापर टाळावा. पशुवैद्यकाच्या सल्ल्याने योग्य उपचार करावेत.


# गाय, म्हैस यांची शिंगे का कापली जातात?

## वेळीच लक्ष नाही दिले तर होतो हा गंभीर आजार

मिशा जशी पुरुषांची शान असते अगदी तशाचप्रमाणे बैलांची शिंगे ही त्याची शान असतात. शेतकरी अनेकदा आपल्या जनावरांची शिंगे सणासुदीला रंगवून त्यांना नटवताना आपण पाहतो. पण प्राण्यांची शिंगे नक्की का रंगवली जातात याची माहिती असणे आवश्यक आहे. तसेच अनेकदा प्राण्यांची शिंगे काढली जातात यामागचे कारण तुम्ही ऐकलंय का? आज आपण याबाबत अतिशय इंटरेस्टिंग माहिती समजून घेणार आहोत. गाय, म्हैस, मेंढी अशा अनेक प्राण्यांना शिंगे असतात. प्रत्येक प्राण्याच्या शिंगांचा आकार हा वेगवेगळा असतो. कोणाची शिंगे एकदम रेखीव दिसतात तर कोणाची खूपच वेडीवाकडी असतात. मात्र शिंगांमुळे प्राण्यांना अनेक आजारसुद्धा होतात. यापासून वाचण्यासाठी बऱ्याचदा प्राण्यांची शिंगे वरचेवर रंगवली जातात./शिंगांचे फायदे :प्राणी शिंगांनी स्वतःचे रक्षण करतात. शिंगांमुळे चालत असताना किंवा धावताना त्यांना संतुलन निर्माण करता येते.

शिंगांचे तोटे :शिंगे असण्याचे फायदे कमी अन तोटे जास्त आहेत हेपण तितकेच खरे आहे. प्राण्यांना शिंगांमुळे अनेक गंभीर आजार होतात. प्राण्यांच्या एकमेकांमधील भांडणांमध्ये शिंगांमुळे गंभीर दुखापत होऊन अनेकदा प्राण्यांचा मृत्यू होतो.

शिंग कापण्याची काय गरज? शिंगे कंपन्यांच्या क्रियेला डी हॉर्निंग असे म्हणतात. शिंगे काढून टाकल्याने निर्जंतुकीकरण किंवा डिसबॉन्डिंग होते असं समजलं जातं. वासरे ५ ते १० दिवसांची



झाल्यावर त्यांची शिंगे काढली जातात. तसेच वेळीच शिंगे काढून टाकल्याने जरी पुढे जाऊन सदर प्राण्याची दुसऱ्या प्राण्यांसोबत भांडण झाले तरी कोणी कोणाला गंभीर दुखापत करत नाही. तसेच जनावर मारके झाले तरी मालकाला त्यापासून जास्त धोका राहत नाही.

शिंगे नसण्याचे फायदे :शिंग नसलेले प्राणी जगण्यासाठी कमी जागा घेतात. शिंग नसलेले प्राणी भांडणात एकमेकांना इजा करत नाहीत. शिंग नसलेले प्राणी हल्ला झाल्यावर एखाद्या व्यक्तीला इजा करत नाहीत. शिंगे नसलेल्या प्राण्यावर उपचार करणे सोपे आहे. शिंगांमुळे रोग होतो

हॉर्न कर्करोग : प्राण्यांच्या शिंगामुळेही अनेक प्रकारचे रोग होतात. यामध्ये प्रामुख्याने शिंगाचा कर्करोग होण्याचे प्रमाण अधिक आहे. सुमात्रा, आशिया आणि ब्राझीलमध्ये प्राण्यांमध्ये शिंगाच्या कर्करोगाचे प्रमाण अधिक आढळते. यामध्ये शिंगाच्या काही पेशी विनाकारण वाढतात व मऊ होतात. पुढे शिंग मऊ होऊन दुसऱ्या बाजूला लटकते. शिंगात दुखत असल्याने प्राणी आपले डोके एका बाजूला झुकवून ठेवतो. जनावराच्या शिंगावर जाड थर अडकलेला असतो. जनावरांमध्ये आपसी भांडण झाल्यावर, सिगजवळ खाज सुटली किंवा कुठेतरी अडकून काही रोग झाला की शिंगाचे कवच गळून पडते, कवच बाहेर पडताच त्यातून रक्त येते.

शिंगाचा कर्करोग कसा ओळखावा : शिंगाचा कर्करोग झालेला प्राणी सतत डोके हलवतो. शिंगाला भीतीवर सतत घासून घेतो. यामुळे जनावरांच्या नाकातून रक्त येणे किंवा शिंग तुटून पडते अशा घटना घडतात. अशावेळी वेळेवर पशुचिकित्सकांचा सल्ला घेणे खूप गरजेचे आहे.

# फळ रोपवाटिक

पावसाळ्यामध्ये तयार केलेल्या आणि उन्हाळी हंगामात तयार करण्यात आलेल्या कलमे, रोपांची उन्हाळी हंगामात विशेष काळजी घेणे महत्त्वाचे असते. उन्हाळी हंगामात रोपांचा तजेलदारपणा टिकून राहण्यासाठी पाण्याचे काटेकोर नियोजन आणि आच्छादनाचा वापर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. रोपवाटिकेतील कलमे, रोपांना पाटपाणी, प्लॅस्टिक पाइप व झारी, सूक्ष्म तुषार सिंचनाद्वारे पाणी दिले जाते. ज्या कलमांचे हार्डनिंग (रोपे सामान्य वातावरणात वाढीसाठी तयार होणे) झाले आहे अशी कलमे, रोपे चरात किंवा सपाट वाफ्यात ठेवावीत. पाटपाणी द्यावयाचे असल्यास ४ ते ५ दिवसांच्या अंतराने हलकेसे पाणी द्यावे. पाणी जास्त काळ साचून राहू नये म्हणून चरास / वाफ्यास किंचित (०.१ ते ०.५ टक्का) उतार असावा. पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी व कलमांची गुणवत्ता टिकून राहण्यासाठी पॉलिथिन कागदाच्या (मल्चिंग पेपर) व वाळलेल्या गवताच्या साह्याने आच्छादन करावे. तसेच चर, वाफ्याच्या तळाला पॉलिथिन पेपर टाकावा जेणेकरून मुळे जमिनीत जाणार नाही आणि पाण्याची बचत होईल. सूक्ष्म तुषार सिंचनाची सोय असल्यास पाण्याची साधारणतः २५ ते ३० टक्के बचत होते. कलमे, रोपांना आवश्यक तेवढेच पाणी देणे शक्य होते. त्यासाठी दोन तास प्रति दिवस या प्रमाणे सूक्ष्म तुषार सिंचन संच चालवावा. सूक्ष्म तुषार सिंचन संचाच्या वापरामुळे रोपवाटिकेत जमिनीलगत आर्द्रता तयार होते, त्यामुळे कलमे, रोपांची जोरदार वाढ होते. प्रखर सूर्यप्रकाशामुळे कलमांची पाने करपत नाहीत. सूक्ष्म तुषार सिंचनाद्वारे मिळणारे पाणी हे सूक्ष्म थेंबाद्वारे मिळत असल्यामुळे नाजूक कलमे, रोपांना इजा होत नाही.

शेडनेटचा वापर : सध्या बाजारामध्ये ५० आणि ७५ टक्के क्षमतेचे शेडनेट उपलब्ध आहेत. लोखंडी अँगल व जी.आय. पाइपच्या साह्याने कायमस्वरूपी किंवा कमी खर्चात निलगिरी, सुरू व बांबूचा



वापर करून तात्पुरते उन्हाळी हंगामापुरते शेडनेट हाउस तयार करावे. उन्हाळी हंगामामध्ये कलमे शेडनेट हाउसमध्ये ठेवल्यास त्यांचे अति उष्णता व कडक सूर्यप्रकाश यापासून संरक्षण होते. कलमे चांगल्या गुणवत्तेची तयार होतात.

फॉगर्स, मिस्टर्सचा वापर : उष्ण व कोरड्या हवामानाचा कलमे, रोपांच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम होतो. त्यासाठी फॉगर्स व मिस्टर्सचा वापर करावा. त्यांच्या वापरामुळे उष्णता कमी होऊन हवेतील आर्द्रता वाढण्यास मदत होते. त्यामुळे कलमे, रोपे ताजी व टवटवीत राहतात व जोमदार वाढ होते.

खत व्यवस्थापन : उन्हाळी हंगामात योग्य प्रकारे खत व्यवस्थापन केल्यास कलमे, रोपांची जोमदार वाढ होते. डीएपी. ५० ते ७० ग्रॅम प्रति वाफा (३ बाय २ मी.) आणि प्रति महिना पाणी देण्यापूर्वी द्यावा. तसेच पाण्यात विरघळणारी १९:१९:१९ या प्रकारची खते फवारणीद्वारे देता येतील. त्यासाठी १ टक्का तीव्रतेच्या द्रावणाची रोपांच्या पानावर फवारणी करावी.

माती मिश्रणावर प्रक्रिया : कलमे, रोपे तयार करण्यासाठी वापरात येणाऱ्या माती मिश्रणावर प्रक्रिया करणे गरजेचे असते. रोपवाटिकेत तयार करावयाच्या कलमे/ रोपांचे आधीच नियोजन करून त्यासाठी लागणारे माती मिश्रण उन्हाळी हंगामातच तयार करून ठेवावे, कारण पावसाळा सुरू झाल्यानंतर कोरडा पोयटा व माती मिळणे कठीण असते. रोपवाटिकेसाठी वापरण्यात येणाऱ्या मिश्रणामधील बुरशी, सूत्रकृमी व तणांचा नाश करण्यासाठी मिश्रण निर्जंतुकीकरण करणे गरजेचे असते.

बियाणे पेरणी :सीताफळ, आवळा, चिंच व खिरणी तसेच बीपासून तयार होणाऱ्या झाडांच्या बिया उन्हाळी (मार्च ते मे) हंगामात गोळा करून ठेवाव्यात. खिरणीचे बी ताजे पेरावे लागते. बी गोळा करून योग्य ती बीजप्रक्रिया करून गादीवाफ्यावर किंवा पिशवीत पेरावे. खिरणीची रोपे पुढील हंगामात चिकू कलमे बांधण्यासाठी उपयोगी पडतात. वारा प्रतिबंधक वनस्पतींचा ताटवा रोपवाटिकेभोवती लावावा. उदा. शेवरी, पांगारा. यामुळे उन्हाळी हंगामात प्रसंगी वाहणारा वारा तसेच वादळापासून रोपवाटिकेचे संरक्षण काही प्रमाणात करता येते. रोपवाटिकेभोवती तसेच आतमध्ये चर खोदून त्यात पाणी सोडावे त्यामुळे विशेषतः एप्रिल- मेमध्ये हवेतील तापमान खूपच वाढलेले असताना रोपवाटिकेतील तापमान काहीसे कमी होऊन आर्द्रता वाढते, ज्यांचा रोपांच्या वाढीवर अनुकूल परिणाम होतो.

गुटी आणि दाब कलमाची काळजी : डाळिंब, पेरूची अभिवृद्धी गुटी कलमांनी केली जाते. अंजिराची अभिवृद्धी छाट कलमाद्वारे केली जाते. सदर फळझाडांच्या वर्षभर असलेली मागणी पाहता थंडीचा २ ते ३ महिन्यांचा कालावधी सोडला तर वर्षभर कलमांची मागणी सुरू असते. उन्हाळी हंगामामध्ये तयार केलेल्या गुटी व दाब कलमांची विशेष काळजी घ्यावी. कारण जास्त तापमान व प्रखर सूर्यप्रकाशामुळे मुळ्या तयार होण्यावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. त्यासाठी उन्हाळी हंगामामध्ये तयार केलेल्या गुटी व छाट कलमांना १५०० ते २००० पीपीएम तीव्रतेचे आयबीए संजीवक कलम करण्याच्या जागेवर लावावे, म्हणजे मुळ्याची लवकर व तंतुमय वाढ होते. कलमे बांधलेल्या पेरू, डाळिंब व अंजीर रोपांना पाण्याचा ताण बसणार नाही याची काळजी घ्यावी. वाळलेला पालापाचोळा व गवत किंवा पॉलिथिन पेपरच्या साहाय्याने आच्छादन केल्यास ओलावा जास्त दिवस टिकून राहतो. पावसाळी हंगामात तयार केलेल्या आंबा, पेरू, डाळिंब या कलमांची कडक उन्हाळा व तीव्र सूर्यप्रकाश यापासून योग्य प्रकारे पाणी नियोजन करून काळजी घ्यावी. डिसेंबर, जानेवारी महिन्यांत तयार केलेली सीताफळ कलमेसुद्धा नाजूक व कोवळी असल्याने कडक उन्हाळा व तीव्र सूर्यप्रकाशापासून योग्य प्रकारे पाणी नियोजन करून काळजी घ्यावी.

# बहूपयोगी सेंद्रिय कीटकनाशक दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धती

सेंद्रिय कीटकनाशकाचा वापर करून किडींचे योग्य व्यवस्थापन करता येते. यामुळे पिकांचे सुद्धा नुकसान होत नाही. सेंद्रिय शेतीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अर्क तयार केले जातात. त्यापैकीच एक म्हणजे दशपर्णी अर्क होय. दशपर्णी अर्क हा अत्यंत बहुगुणी आणि बहुउपयोगी अर्क आहे. नावाप्रमाणेच या अर्कात १० वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पतीचा उपयोग केला जातो. वेगवेगळ्या उग्र वासाच्या वनस्पतीचा पाला यात वापरला जातो. दशपर्णी अर्क हे नैसर्गिक किटकनाशक असून, हे शेतकर्यांसाठी खूप फायदेशीर आहे व शेतीचा खर्च यामुळे नक्कीच कमी होवू शकतो.

दशपर्णी अर्कासाठी वनस्पतीचा वापर :कडुनिंब पाला ५ किलो, एरंडपाला २ किलो, गुळवेलपाला २ किलो, घाणेरीपाला २ किलो, पपईचा पाला २ किलो, सिताफळाचा पाला २ किलो, रूईचा पाला २ किलो, पांढरा धोतरा २ किलो, करंजपाला २ किलो, लाल कन्हेरपाला २ किलो, झेंडू पाने, निरगुडी, बेशरम, पेरू इत्यादी २ किलो.

इतर साहित्य :प्लास्टीक टाकी २०० लिटर, देशी गायीचे शेण ३ किलो, देशी गायीचे गोमूत्र ५ लिटर, हिरवी मिरची ठेचा २ किलो, लसुण ठेचा पाव किलो, वरीलपैकी कोणत्याही १० वनस्पतीचा पाला घ्यावा. एखाद दुसरी वनस्पती उपलब्ध नसल्यास इतर कोणत्याही उग्र वनस्पतीचा पाला चालू शकतो. शक्यतो देशी गायीचे शेण ताजे घ्यावे, सुकलेले वापरू नये. गोमूत्र जितके जुने तेवढा त्याचा औषधी गुणधर्म जास्त असतो.

दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धत :यापैकी करंज, रूई, सिताफळाचा पाला, कडुनिंबाचा पाला, महत्त्वाचा बाकीचे सर्व उपलब्ध असतील त्यानुसार घेणे सर्व मिळून १० वनस्पती होणे गरजेचे आहे.

राज्य लोकतंत्र
# मराठवाडा वृत्तांत
रविवार दि.१० मे २०२६ ५

## निदा खान प्रकरणात इम्तियाज जलील यांना सहआरोपी करा-मंत्री संजय शिरसाट

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

नाशिच्या आयटी कंपनीतील बेकायदेशीर धर्मांतर प्रकरणातील संशियत आरोपी निदा खान हिला मदत करण्याच्या प्रकरणात एमआयएम नेते इम्तियाज जलील यांना सहआरोपी करा, अशी मागणी पालकमंत्री संजय शिरसाट यांनी केली आहे. याबाबतची मागणी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार असल्याचं संजय शिरसाट म्हणाले आहेत. ''पोलिसांनी ज्यांना अटक केली आहे त्यामध्ये निदा खान हिची आई आणि मावशी आहे. ज्या रुममध्ये पकडलं गेलं ती रुम एका नगरसेवकाची आहे. रुम त्याच्या नावावर नाही. पण त्याच्या मालकीची आहे. इम्तियाज जलील यांचं नाव घेण्यामागचं कारण असं की, त्यांनी यापूर्वी नाशिकला जावून तिची पाठराखण केली होती. एखादा आरोपी जेव्हा निष्पन्न होतो तेव्हा त्याला लपवणं हा सुद्धा गुन्हा होता. हा गुन्हा इम्तियाज



जलील आणि त्यांच्या पक्षाच्या लोकांनी केलं आहे. त्यामुळे पोलिसांनी त्यांना सहआरोपी केलं पाहिजे'', अशी मागणी संजय शिरसाट यांनी केली आहे.

दरम्यान, संजय शिरसाट यांनी पत्रकार परिषद घेऊन याबाबत आरोप केले आहेत. ''मुंब्र्याचं प्रकरण असो, नाशिकचं असो, पुण्याचं असो, अनेक ठिकाणी एमआयएमने या अशाप्रकारच्या गतीविधी वाढवण्याचा प्रयत्न करत आहेत. धर्मांतर करणे, मुलींना फसवणं हे सगळे प्रकार एमआयएमच्या महाशयांच्या नेतृत्वात होतात. म्हणून ही निदा खान म्हणून जी महिला आहे, ही एक छोटीशी मोहरा आहे. त्यांचं जाळं महाराष्ट्रभर पसरलेलं आहे. आपल्याला हे प्रकार अहिल्यानगर, पुण्यात पाहायला मिळतील. छत्रपती संभाजीनगरमध्येही पाहायला मिळतील. हे विष ज्या पद्धतीने पसरवलं जात आहे, हिंदूंचा द्वेष करणं, त्यांचा धर्मांतर करणे, या प्रकरणामुळे आता समाजामध्ये एक प्रकारचा राग आणि चीड निर्माण व्हायला लागली आहे'', असं संजय शिरसाट म्हणाले.''नाशिकचं प्रकरणही त्याच पद्धतीचं आहे. निदा खानला पकडलं गेलं आहे. आता तिच्याकडून अनेक माहिती समोर येणारच आहे. पण या प्रकरणी एसआयटी चौकशी झाली पाहिजे, यातील मास्टरमाईंड कोण आहे तो समोर आला पाहिजे, अशी मागणी मी मुख्यमंत्र्यांकडे करणार आहे'', अशी भूमिका त्यांनी मांडली.''मला वाटते या प्रकरणाचे धागेदोर फार लांबवर गेले असावेत. जे वयात आलेले मुलं आहेत, ज्यांचा वयोगट २२ ते ३० च्या दरम्यान आहे, त्यांना अशाप्रकारे ट्रेंड करणं, हाती काम नाही, शिक्षण नाही, पण दीड लाखांचे मोटारसायकल आहे, आयफोन आहे, फिरायला त्यांच्याकडे पैसे आहेत. हे पैसे त्यांच्याकडे कुठून येतात? याचा सुद्धा तपास पोलिसांनी केला आहे. बलात्कार, धर्मांतर, फसवणूक आणि नशेखोरीचा प्रयत्न या माध्यमातून केला जातो. त्यामुळे मी एमआयएमचे नेते इम्तियाज जलील, आणि त्यांच्याबरोबर असणाऱ्या इतर सर्व जणांची चौकशी झाली पाहिजे. या चौकशीतून निश्चितच मोठे षडयंत्र पाहायला मिळेल'', असा मोठा दावा संजय शिरसाट यांनी केला.

## कुमारी वैष्णवी गोल्हार प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण

पाथर्डी । प्रतिनिधी

श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्ट संचलित भगवान विद्यालय खरवंडी कासार विद्यालयाच्या इयत्ता दहावीचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला यामध्ये भगवान विद्यालयाचा सरासरी निकाल ९७.२४ % लागला भगवान विद्यालयाची इयत्ता दहावीची कुमारी वैष्णवी पंपू गोल्हार हिने ९०.८०% मिळवून प्रथम क्रमांक मिळवला तर ढाकणे ऋतुजा बाबुराव ८९.८०% द्वितीय व धारकर समर्थ दत्तात्रय ८९% तृतीय क्रमांक मिळवत उत्तीर्ण झाले आहेत.



यशस्वी विद्यार्थ्यांनी दरवर्षीप्रमाणे भगवान विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे भगवान विद्यालयातील मुख्याध्यापक भीमराव सोनवणे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत भगवानगडाचे संस्थापक अध्यक्ष ऐश्वर्यसंपन्न संत भगवानबाबा यांनी ९ जून १९५९ रोजी भगवान विद्यालयाची स्थापना केली होती जवळपास ६७ वर्षांपूर्वी भगवानबाबांनी भगवानगड परिसरातील दर्याखोऱ्यातील कष्टकरी शेतकरी श्रमिक ऊसतोड मजुरांच्या पालकांच्या मुलांच्या भवितव्यासाठी भगवान विद्यालयाची स्थापना करून या भगवान विद्यालयातून अनेक विद्यार्थी उच्चपदस्थ अधिकारी शासकीय नोकरी भारतीय सैन्य दलात पोलीस खात्यात देशसेवा करण्यासाठी दाखल झाले आहेत भगवान गडाचे महंत न्यायाचार्य डॉ.नामदेव महाराज शास्त्री उत्तराधिकारी कृष्णा महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली भगवान विद्यालयाची यशस्वी घोडदौड चालू असल्याने पालकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## हळदीला जाताना काळाची झडप, इंजिनिअरिंगच्या विद्यार्थिनीचा अपघातात मृत्यू

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

एक दिवस आधीच परीक्षेचा शेवटचा पेपर देऊन आनंदाने घरी परतलेल्या १७ वर्षीय तेजलवर नियतीने दुसऱ्याच दिवशी झडप घातली. नातेवाईकाच्या हळदीच्या कार्यक्रमासाठी वडिलांसोबत दुचाकीवरून जात असताना, भरधाव कंटेनरने दिलेल्या धडकेत तेजल प्रधान हिचा जागीच मृत्यू झाला. तर तिचे वडील गंभीर जखमी असून त्यांच्यावर घाटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ढोरेगाव शिवारातील शिवना नदीच्या पुलाजवळ हा भीषण अपघात घडला.

तेजल काकासाहेब प्रधान वय १७ रा.आंबेलोहोळ ता. गंगापूर असे मयत झालेल्या विद्यार्थिनीचे नाव आहे.काकासाहेब गिरजाबा प्रधान रा.आंबेलोहोळ ता. गंगापूर ४६ हे गंभीर आहे.काकासाहेब हे आपली मुलगी तेजल हिला घेऊन दुचाकीवरून बगडी




येथे नातेवाईकाच्या हळदीच्या कार्यक्रमासाठी निघाले होते. दुपारी छत्रपती संभाजीनगर-पुणे महामार्गावरील ढोरेगाव शिवारात शिवना नदीच्या पुलाजवळ समोरून येणाऱ्या एका वेगवान कंटेनरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, दोघेही रस्त्यावर फेकले गेले.तेजल ही अत्यंत हुशार विद्यार्थिनी होती. तिने दहावीच्या परीक्षेत ९४ टक्के गुण मिळवून यशाला गवसणी घातली होती. सध्या ती शासकीय तंत्रनिकेतन छत्रपती संभाजीनगर येथे इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या पहिल्या वर्षात शिकत होती. गुरुवारीच तिने प्रथम वर्षाचा शेवटचा पेपर दिला होता. सुट्ट्या लागल्याचा आणि परीक्षा संपल्याचा आनंद साजरा करत असतानाच, २४ तासांच्या आतच तिचा अपघाती मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने दोघांना गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासून तेजलला मृत घोषित केले. तिचे वडील काकासाहेब प्रधान यांना गंभीर दुखापत झाल्याने प्रथमोपचार करून त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. त्यांची प्रकृती सध्या चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

## पत्रकार अमानुष मारहाण प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक संदीप ढाकणे विलास जाधव याच्यावर कारवाई कधी?

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील भगवानगड परिसर प्रेस क्लबचे अध्यक्ष व पत्रकार दादासाहेब खेडकर हे खरवंडी कासार येथे बारावी बोर्डाची परीक्षा सुरू असताना वार्तांकन करण्यासाठी जवळवाडी रोड येथील संत भगवानबाबा उच्च माध्यमिक विद्यालयाकडे जात असताना बारावीच्या पहिल्या इंग्रजीच्या पेपरला छत्रपती संभाजीनगर पुणे मुंबई बीड जालना अशा पाच ते सात जिल्ह्यातून बाहेरील विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झालेले असल्याने पालकांची तुफान गर्दी होती ट्राफिक जाम झाल्याने आणि पालकांचा मोठा जमाव असल्याने गर्दीतून गाडी काढणे शक्य नव्हते अशा परिस्थितीत पालकांना परीक्षा केंद्र बाहेर पाचशे मीटरच्या आत न येऊ देणे व ट्राफिक अशा दुहेरी परिस्थितीत पोलीस बंदोबस्त सांभाळणारे पोलीस उपनिरीक्षक संदीप ढाकणे याने पत्रकार दादासाहेब खेडकर यांना अमानुष मारहाण

> शेवगाव येथील उपविभागीय पोलीस कार्यालयात माझा जबाब नोंदविण्यात आला आहे एक महिना उलटून गेला तरी अद्यापपर्यंत चौकशी अहवाल पोलीस अधीक्षक कार्यालयाला पाठवला नाही पीएसआय संदीप ढाकणे व विलास जाधव याला वाचवण्यासाठी जाणीवपूर्वक अहवाल देण्यास टाळाटाळ होत आहे का अशी माझ्या मनात शंका आहे या संदर्भात नवीन पोलीस अधीक्षक ममूक्का सुदर्शन यांची भेट घेऊन पीएसआय संदीप ढाकणे व सहकारी पीएसआय विलास जाधव याना अमानुष मारहाण प्रकरणात तातडीने निलंबित करण्याची मागणी करणार आहे.
>
> -प्रा.दादासाहेब खेडकर(पत्रकार -अध्यक्ष भगवानगड परिसर प्रेस क्लब)

केली आणि नायब तहसीलदार किशोर सानप यांनी खोटी फिर्याद देऊन खोटे गुन्हे दाखल केले अमानुष मारहाण झाल्याने दादासाहेब खेडकर हे आठ दिवस गंभीर दुखापतग्रस्त होते त्यांनी उपजिल्हा रुग्णालय पाथर्डी खरवंडी कासार प्राथमिक आरोग्य केंद्र व खाजगी रुग्णालयात उपचार घेऊन अहिल्यानगर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना भगवानगड परिसर प्रेस क्लब पत्रकार संघटनेच्या वतीने लेखी निवेदन देऊन पोलीस उपनिरीक्षक संदीप ढाकणे व विलास जाधव यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची व पत्रकाराला अमानुष मारहाण करत मानवी हक्कांचे उल्लंघन करणे आणि कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी निलंबनाची मागणी केली आहे तशा स्वरूपाचा लेखी अर्ज पोलीस तक्रार प्राधिकरण नाशिक मानवअधिकार विभाग यांच्याकडे केला आहे.

## नगर परिषद छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर टप्पा एक यशस्वी

अंबड। प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिर टप्पा क्रमांक एक हे आज अंबड शहरातील मस्त्योदरी देवी संस्थान पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभाग्रहात पार पाडण्यात आले. सदर अभियानामध्ये नगर परिषदेच्या वतीने खालील प्रमाणे विविध योजनांच्या लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आलेला आहे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) १.० व २.० यांच्या लाभार्थी याना ५ ब्रास मोफ़त रेती चे पत्र दैन्यात आले आहे. त्या मध्ये पंत प्रधान आवास योजना १.० मधील ११९ आणि २.० मधील १३३ असे लाभार्थी असून एकूण १२६० ब्रास मोफत वाळू चे प्रमाणपत्र वाटप करणेत आले.

तसेच प्रधान मंत्री आवास योजना शहरी २.० अंतर्गत १३३ लाभार्थी याना बांधकाम परवानगी देन्यात आले. तसेच रमाई आवास योजनेच्या लाभार्थी याना धनादेश देन्यात आले आहेत. अंबड नगर परिषद अंतर्गत राबविण्यात येत असणाऱ्या अंतर्गत स्थापन



महिला बचत गटांना, येथील भारतीय स्टेट बँक, शाखा-अंबड यांच्या वतीने आज एकुण २४ गटांना एकत्रित रक्कम २ कोटी ७५ लक्ष रुपये एवढे तर बँक शाखा- अंबड यांच्या कडून २ बचत गटाला १५ लक्ष रुपये कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच ह्या योजने अंतर्गत एकूण २५ रस्त्यावर विक्री करणाऱ्या उद्योजकांना १० लाखाचे कर्ज वाटप करणेत आले. दिव्यांग निधी ( ५% राखीव ) अंतर्गत एकूण ₹१.७७ लक्ष इतका प्रत्येकी ₹१६०० निधी वाटप करणेत आला. नगर परिषद हद्दीमधील सर्वे नंबर ४०७ मध्ये अतिक्रमण करून राहत असलेल्या आदिवासी भिल्ल समाजातील नागरिकाना अतिक्रमण नियमानुकूल करून त्याना पट्टे वाटप करण्यात आले. हे अभियान यशस्वी करण्यासाठी शहरातील विविध विभागांचे अधिकारी कर्मचारी यांनी परिश्रम घेतले विशेषतः उपविभागीय अधिकारी श्री उमाकांत पारधी तहसीलदार श्री विजय चव्हाण मुख्याधिकारी श्री मनोज उकिरडे व विविध विभागांचे प्रमुख अधिकारी कर्मचारी यांनी परिश्रम घेतले आहेत. या अभियान शिबिरास आमदार श्री नारायण कुचे मा. विभागीय आयुक्त जी श्रीकांत मा. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व नगर परिषद अंबड च्या नगर अध्यक्षा देवयानी केदार कुलकर्णी तसेच शहरातील सर्व नगरसेवक विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा:महावितरणचे एकतर्फी वर्चस्व

### ४ सांघिक विजेतेपद पटकावले, कबड्डीमध्ये १५ वर्षांनी उधळला यशाचा गुलाल

छत्रपती संभाजीनगर

एमएसईबी होल्डिंग कंपनीच्या वतीने आयोजित अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय स्पर्धेत महिला पुरुष गटातील कबड्डी व खो-खो तसेच कुस्तीमध्ये महावितरणने तब्बल चार सांघिक विजेतेपद व एक उपविजेतेपद मिळवत एकतर्फी वर्चस्व राखले. बालेवाडी (पुणे) येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात देशभरातली विद्युत कंपन्यांच्या तीन दिवसीय राष्ट्रीय स्पर्धेचा शुक्रवारी सायंकाळी समारोप झाला. दरम्यान, महावितरणच्या कबड्डी पुरुष संघाने बलाढ्य हिमाचल प्रदेश संघाचा अटीतटीच्या अंतिम सामन्यात पराभव करीत १५ वर्षांनंतर विजेतेपदाचा मान मिळवला. राष्ट्रीय स्पर्धेतील सर्व सांघिक व वैयक्तिक विजेत्यांना करंडक व प्रशस्तिपत्राने गौरविण्यात आले.

बालेवाडी येथील विद्युत कंपन्यांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महावितरणच्या सांघिक विजेत्या व उपविजेत्या संघातील खेळाडूंना करंडक व प्रशस्तिपत्राने संचालक दत्तात्रेय पडळकर यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, आयोजन समितीचे अध्यक्ष सुनील काकडे, उपाध्यक्ष अनिल कोलप आदींची उपस्थिती होती. बालेवाडी येथील विद्युत कंपन्यांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महावितरणच्या सांघिक विजेत्या व उपविजेत्या संघातील खेळाडूंना करंडक व प्रशस्तिपत्राने संचालक दत्तात्रेय पडळकर यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, आयोजन समितीचे अध्यक्ष सुनील काकडे, उपाध्यक्ष अनिल कोलप आदींची उपस्थिती होती.

अत्यंत चुरशीच्या उपांत्य फेरीमध्ये प्रतिस्पर्धी संघावर मात करीत मागील वर्षीचा विजेता हिमाचल प्रदेश विरुद्ध महावितरण संघ यंदाही आमनेसामने आले. दोन्ही संघात राष्ट्रीय खेळाडूंचा सहभाग असल्याने अंतिम सामन्यासाठी क्रीडा प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली. सामन्याच्या पहिल्या पाच ते सात मिनिटात हिमाचल प्रदेशने आक्रमक चढाईवर भर देत ६ विरुद्ध २ अशी आघाडी घेतली. सर्व गडी बाद झाल्यानंतर कोर्टात एकमेव असलेल्या महावितरणच्या नीलेश ठाकूर याने आक्रमक चढाईत हिमाचल प्रदेशच्या दोन खेळाडूंना बाद केले. लगेचच विरोधी चढाई करणाऱ्या हिमाचल प्रदेशचा मातब्बर रामगोपालला महावितरणच्या तीन बचावपटूंनी बाद केले आणि याच ठिकाणी सामना फिरला. त्यानंतर हिमाचल प्रदेशने आक्रमक चढाईऐवजी सावध व बचावात्मक पवित्रा स्वीकारला. तोच पवित्रा स्वीकारून महावितरणकडून कर्णधार अमित जाधव, अभिषेक नर, अजय शिंदे, रजत गोमासे, रोहित जिवतोडे, नीतेश पोवार, प्रतिक मुरकुटे, दीपक माने यांनी बचावात्मक फळीला आणखी आक्रमक बनवले. हिमाचल प्रदेशच्या गुरूमीत, अभिनंदन, हेमराज, मनीष कुमार, गुरुविंदर या बलाढ्य चढाईपटूंना बाद करीत सामन्यावर पकड मिळविली. मध्यंतरापर्यंत महावितरण संघ १७ विरुद्ध १३ गुणांनी आघाडीवर होता. अत्यंत चुरशीच्या व रंगतदार सामन्यात अखेर महावितरणने ३४ विरुद्ध २४ गुणांनी बलाढ्य हिमाचल प्रदेशवर मात केली व या राष्ट्रीय स्पर्धेत १५ वर्षांनंतर कबड्डीमध्ये विजेतेपद मिळवले. यात संघाचे प्रशिक्षक नीलेश नाईक व व्यवस्थापक रामगोपाल अहिर यांचेही योगदान महत्वाचे ठरले. कबड्डीच्या महिला गटात देखील महावितरण विरुद्ध हिमाचल प्रदेश अशी लढत झाली. मात्र हिमाचल प्रदेशने सुरवातीला घेतलेली आघाडी कायम ठेवत महावितरणचा २१ विरुद्ध १२ गुणांनी पराभव केला. त्यामुळे महावितरणच्या महिला कबड्डी संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

## शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी डिजिटल स्वगणना नोंदणी करावी-जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

### १५ मे पूर्वी ऑनलाइन माहिती भरावी

जालना। प्रतिनिधी

भारत सरकारच्या आगामी १६ व्या जनगणना-२०२७ प्रक्रियेअंतर्गत नागरिकांनी डिजिटल स्व-गणना प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. यासंदर्भात गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी जालना आशिमा मित्तल यांनी सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांना सूचना जारी केल्या आहेत.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, देशातील १६ वी जनगणना जानेवारी २०२६ ते फेब्रुवारी २०२७ या कालावधीत दोन टप्प्यात पार पडणार आहे. जनगणनेच्या



पहिल्या टप्प्यात नागरिकांना स्वतःची माहिती ऑनलाइन पद्धतीने नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी भारत सरकारच्या संकेतस्थळावर डिजिटल स्व-गणना प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

ही ऑनलाइन स्व-गणना प्रक्रिया १ ते १५ मे, २०२६ या कालावधीत राबविण्यात येत असून, सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांचे विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वतःची डिजिटल स्व-गणना पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच संबंधित कार्यालयांतील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनीही ही प्रक्रिया निश्चित मुदतीत पूर्ण करावी. ज्या अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांनी अद्याप स्व-गणना केलेली नाही किंवा प्रक्रिया अपूर्ण ठेवली आहे, त्यांनी तातडीने नोंदणी पूर्ण करून त्याचा प्रमाणित अहवाल सादर करावा. संबंधित कार्यालयांनी १५ मे २०२६ पर्यंत डिजिटल स्व-गणना पूर्ण करून १६ मे, २०२६ रोजी पर्यंत संख्यात्मक अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी देखील या सुविधेचा लाभ घेऊन स्वतःची व कुटुंबाची माहिती अचूकपणे नोंदवावी. असे आवाहन जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

## सर्व व्यापाऱ्यांनी रात्री साडेदहा नंतर दुकाना बंद करावे-पो. नि. देशमुख

मंठा। प्रतिनिधी

जिल्ह्याचे नूतन पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांच्या आदेशानुसार मंठा पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व प्रतिष्ठाने रात्री साडेदहा नंतर बंद ठेवावेत, नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई केली जाईल असा कडक इशारा मंठा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांनी दिला आहे.कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी आणि गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सर्व दुकाने, हॉटेल्स, ढाबे आणि इतर व्यावसायिक प्रतिष्ठाने रात्री साडेदहा वाजेपर्यंत अनिवार्यपणे बंद करण्याचे कडक निर्देश त्यांनी दिले आहेत. अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. तसेच रात्री साडेदहा नंतर संशयास्पद हालचाली आढळून आल्यास कठोर कारवाईचा इशारा श्री देशमुख यांनी दिला आहे.

> मागील पंधरा दिवसापासून मंठा पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व अवैध धंदे बंद करण्यात आलेले आहेत. तसेच अवैध गुटखा विक्री करणारा विरुद्ध पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांनी चांगलाच बडगा उगारला आहे. गुटखा मिक्स करण्याच्या मशीन जप्त करण्यात आल्या आहेत.

दैनिक
# राज्य लोकतंत्र


# बीड जिल्हयातून १५९९ प्रकरणे राष्ट्रीय लोकअदालतमध्ये निकाली

बीड । प्रतिनिधी

दि. ९ मे २०२६ रोजी बीड मुख्यालयात राष्ट्रीय लोकन्यायालयाचे उद्घाटन आनंद एल.यावलकर, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या हस्ते संपन्न झाले. सदर उदघाटन कार्यक्रमास जिल्हा न्यायाधीश-१ व्ही.एच.पाटवदकर, जिल्हा न्यायाधीश-२ एस.आर.शिंदे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२ आर.एम नेरलीकर मुख्य न्यायदंडाधिकारी पी.आर.शिंदे व इतर न्यायिक अधिकारी तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डॉ.वहाब ए.सय्यद, बीड मुख्यालयातील सर्व



न्यायिक अधिकारी, बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष एस.जी.पिसुरे, उपाध्यक्ष आर.व्ही.देशमुख, सचिव सुभाष काळे तसेच त्यांचे सर्व पदाधिकारी, विधिज्ञ सदर उदघाटन कार्यक्रमास उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशावरूनआनंद एल. यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. ९ मे २०२६ रोजी पार पडलेल्या लोक न्यायालयात बीड जिल्हयातुन एकूण.

## साडेचार कोटीची प्रकरणामध्ये तडजोड

१२०९ प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली आहेत.


बीड जिल्हयातून न्यायालयातील प्रलंबीत प्रकरणांपैकी एकूण ११३५३ प्रकरणे ठेवण्यात आली होती. यामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात, भुसंपादनाची प्रकरणे, १३८ एन.आय.ॲक्टच्या प्रकरणांचा समावेश होता. त्यापैकी ३७१ प्रकरणे निकाली निघाली आहेत. दाखलपुर्व प्रकरणामध्ये एकूण २१११५ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ८३८ प्रकरणे निकाली निघाली आहेत. तसेच स्पेशल डाईव्हचे एकूण प्रलंबीत प्रकरणापैकी ३९० प्रकरणे निकाली निघाली आहेत. असे एकूण १५९९ प्रकरणे निकाली निघाली आहेत. यामध्ये ७ कोटी ४२ लाख ५९ हजार ३३९ एवढ्या रकमेची प्रकरणे निकाली निघाली आहेत. बीड मुख्यालयातून कौटुंबिक न्यायालयातील एकूण ५ प्रकरणे निकाली निघाली असून यामध्ये पाच महिला सासरी नांदावयास जाणेची प्रकरणे यशस्वी झाली आहेत. तसेच मोटार अपघात प्रकरणात एका प्रकरणामध्ये ४ कोटी ४८ लाख ९० ची प्रकरणे ◀◀ पान ३ वर

# वडवणी येथे होणार भव्य शेतकरी भवन

### १ कोटी ५२ लक्ष रुपयांच्या निधी उपलब्ध

वडवणी । प्रतिनिधी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ''शेतकरी भवन'' योजनेंतर्गत वडवणी येथील कृषी उत्पन्न बाजार समिती ऊपलब्द असलेल्या ठिकाणी शेतकऱ्यांसाठी सर्व सोयी युक्त वडवणी शहरात भव्य असे शेतकरी भवनसाठी १ कोटी ५२ लक्ष ८ हजार रु निधीची प्रशासकीय मान्यता मिळाली असल्याचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी सांगितले.



. माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकर दादा सोळुंके हे मतदार संघाच्या विकासासाठी कटिबद्ध असतात,शेतकऱ्यांच्या शेतीसाठी जलसिंचनाची व्यवस्था व्हावी शेतकरी सुजलाम सुफलाम व्हावा शेतकऱ्यांची प्रगती व्हावी यासाठी आमदार प्रकाश दादा सोळंके नियमित शासनाकडून शेतकऱ्यांच्या विविध योजना आणण्यासाठी अग्रेसर असतात.

वडवणी शहरात शेतकऱ्यांच्या मूलभूत सुख सुविधेसाठी ◀◀ पान ३ वर

# कॅफेच्या नावाखाली चालणारे अश्लील प्रकार तातडीने बंद करावेत-आ.प्रकाश सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

शहरात अनेक कॅफे सुरू आहेत. मात्र काही ठिकाणी कॅफेच्या नावाखाली राजरोसपणे अश्लील व बेकायदेशीर प्रकार सुरू असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे.यापूर्वीही एका मुलीवरील अत्याचाराची घटना समोर आली होती, परंतु त्यानंतर माजलगाव शहर पोलीसांनी अपेक्षित व ठोस कार्यवाही केलेली न केल्याने यासंदर्भात आ.प्रकाश सोळंके यांनी माजलगाव शहरातील अनाधिकृत कॅफेवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी दि ०९ मे



शनिवार रोजी माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

अनेक कॅफे आवश्यक परवान्यांशिवाय सुरू असून अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. काही ठिकाणी अल्पवयीन मुला-मुलींची ये-जा वाढत असून गैरप्रकार घडत असल्याच्या घटनांमुळे पालकांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच नियमबाह्य सुरू असलेले कॅफे तात्काळ बंद करण्यात यावेत, अशी सूचना आ.प्रकाश सोळंके यांनी पोलीस प्रशासनाला यावेळी करण्यात आली. समाजात अशा प्रकारांना थारा मिळू नये आणि युवकांचे भविष्य सुरक्षित राहावे, हीच आपली भूमिका असल्याचे आ.प्रकाश सोळंके स्पष्ट केले.

# बसस्थानकात मनीमंगळसूत्र चोरीचा प्रयत्न; महिला आरोपी रंगेहाथ ताब्यात

माजलगाव । प्रतिनिधी

येथील बसस्थानक परिसरात एका महिलेचे सोन्याचे मनीमंगळसूत्र चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका महिला आरोपीस माजलगाव शहर पोलिसांनी रंगेहाथ पकडले आहे. दरम्यान महिला पोलीस अंमलदार रीजवाना सय्यद यांच्या सतर्कतेमुळे ही कारवाई यशस्वी झाली असून पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाच्या कामगिरीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.''



याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ०६ मे २०२६ रोजी फिर्यादी काशीबाई महादेव पोटभरे (वय ४५, रा.धनेगाव कॅम्प, ता.केज,जि.बीड) या दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास माजलगाव बसस्थानक येथे धनेगावला जाण्यासाठी बसमध्ये चढत होत्या. त्यावेळी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मनीमंगळसूत्र तुटून खाली पडले. संशय आल्याने त्यांनी मागे वळून पाहिले असता एका महिलेचा हात त्यांच्या खांद्यावर दिसून आला.यावेळी बसस्थानक ड्युटीवर नियुक्त असलेल्या महिला पोलिस अंमलदार रीजवाना सय्यद यांनी तत्परता दाखवत संशयित महिला आरोपी पारबतबाई जगन्नाथ काळे (रा.रामेश्वरनगर, ता.जि.परभणी) हिला रंगेहाथ पकडून ताब्यात घेतले व पुढील कारवाईसाठी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात हजर केले.फिर्यादी काशिबाई पोटभरे यांच्या फिर्यादीवरून माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १४२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२), ६२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस अंमलदार रामहरी पटाईत हे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, सहाय्यक पोलीस निरिक्षक प्रल्हाद मुंडे, महिला पोलीस अंमलदार रीजवाना सय्यद, पोलीस अंमलदार नितीन नवले व महादेव बहिरवाळ यांनी केली.

# डॉ.गौरी सागर धस यांच्याकडून श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड मंदिरासाठी ५ लाखांची देणगी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांचे चिरंजीव युवा नेतृत्व सागर सुरेश धस व डॉ. गौरी पांडुळे यांचा विवाह नुकताच नाशिक येथे अत्यंत साध्या पद्धतीने संपन्न झाला. अनावश्यक खर्चाला फाटा देत सामाजिक बांधिलकी जपत नवदांपत्याने एक आदर्श निर्माण केला आहे.

याच औचित्य साधून डॉ. गौरी सागर धस यांनी श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड सावरगाव (मायंबा) देवस्थानच्या भव्य मंदिर नवनिर्माण



व जीर्णोद्धार कार्यासाठी तब्बल ५ लाख रुपयांची देणगी दिली. ही देणगी ट्रस्टचे अध्यक्ष दादासाहेब चितळे व सावरगावचे उपसरपंच मस्के यांच्याकडे सुपूर्त करण्यात आली.

समाजासाठी काहीतरी देण्याची भावना आणि धार्मिक कार्यात योगदान देण्याचा आदर्श या माध्यमातून नवदांपत्याने जपला आहे. त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. यावेळी भारतीताई यादव, उगले मॅडम यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# जान्हवी साळवेने दहावी परीक्षेत घेतले ८४ टक्के गुण

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील मतदारसंघातील आरोग्यदुत म्हणून ओळखले जाणारे नेतृत्व आ.सुरेश आणा धस व आदरणीय प्राजक्ता ताई सुरेश धस विश्वासू यांचे स्वीय सहायक आ सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून आष्टी मतदारसंघातील लोकांसाठी रुग्णांसाठी विविध योजनांची माहिती निधीतून लोकांसाठी रुग्णांसाठी मदत करतात त्यांची मुलगी कु जान्हवी विकास साळवे जिल्हा परिषद कन्या शाळा आष्टी येथील सेमी इंग्लिश इयता दहावी ८४% टक्के उत्तीर्ण झाली आहे त्या यशाबद्दल लोकनेते आ. सुरेश आण्णा धस व प्रजाकाताई सुरेश धस कन्या शाळा मुख्याध्यापक




आबासाहेब खताळ.सुरेश पवार सर माजी विस्ताराधिकारी . बाळासाहेब वीर लेखा अधिकारी बीड सुदाम काकडे सरपंच,भरत दादा जगताप वडवणी नगराध्यक्ष, दिपक उंबरकर, सतिश गर्ज पत्रकार, अजित घुले सरपंच, संतोष ससाणे, अर्जुन नरवडे,किरण पाटील शिंदे, मल्हारी शिंदे सर,राजेंद्र लाड सर, बीड सांगवी सरपंच नंदकिशोर करांडे, सेवा सोसायटी चेअरमन सुभाष तात्या गणगे, बबनराव करांडे भाजपा उपाध्यक्ष, संदिप करांडे माजी उपसरपंच, रंजित ढोबळे रफिक शेख, रामभाऊ गणगे,हरी पवार, सोमनाथ कोल्हे पत्रकार,रवि खवळे, सोमनाथ नरवडे, गौतम नाना आजबे, विनोद नाना रोडे , बाळासाहेब लोंढे सर आसाराम माने संतोष कांबळे, आदि उपस्थित पुढील शिक्षणासाठी जान्हवी ला शुभेच्छा दिल्या आहेत

# जन्मठेपेच्या गुन्ह्यात आरोपींना जामीन मंजूर

बीड । प्रतिनिधी

ऊसतोड मजुरीचे पैसे मागितल्याच्या कारणावरून दलित तरुणाला मारहाण व जातीवाचक शिवीगाळ केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या दोन आरोपींना बीड जिल्हा न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. आरोपींच्या वतीने ॲड. तेजस नेहरकर यांनी केलेला प्रभावी युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने हा निर्णय दिला.



या बाबत अधिक माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील मालेगाव येथील गणेश निलाजी राठोड आणि रमेश निलाजी राठोड यांच्या विरोधात फिर्यादीने पिंपळनेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. ऊसतोड मजुरीचे पैसे मागितल्यावरून दोघांनी मारहाण करत जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप फिर्यादीने यात केला होता. या तक्रारीनंतर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ प्रमाणे गु.र.न. २९२/२०२५ पोलीस स्टेशन पिंपळनेर दि. ११/१०/२०२५ रोजी कलम १४० (३),११५, (२) २३५, ३५१(२),३(५) सह कलम ३(१)()(),३(२)() अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी दोन्ही आरोपींना डी वाय एस पी बीड यांनी अटक केली होती. या प्रकरणात आरोपींच्या बाजूने ॲड. तेजस नेहरकर यांनी न्यायालयात जोरदार बाजू मांडली. फिर्यादीने केलेल्या आरोपांना पुष्टी देणारा ठोस आणि विश्वासार्ह पुरावा अद्याप तपासात समोर आलेला नसल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच, प्रकरणा मागे पूर्वग्रह किंवा इतर कारणांची शक्यता नाकारता येत नसल्याचा मुद्दाही त्यांनी मांडला.

पुराव्याअभावी आरोपींना दीर्घकाळ कोठडीत ठेवणे ◀◀ पान ३ वर

# वनाधिकाऱ्याच्या आशीर्वादाने युसूफवडगांव परिसरात अवैध वृक्षतोड जोरात

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव व परिसरात गेल्या काही दिवसांपासुन अवैध वृक्ष मोठ्या प्रमाणात होत असुन याकडे धारूर वनपरिक्षेत्राचे अधिकारी ईश्वर गुणवंत यांच्या अर्थपूर्ण दुर्लक्ष होता दिसुन येत आहे.

काल रात्री युसूफवडगांव येथे शेवरी जातीच्या वृक्षाची तोड करून जाणारी गाडी क्र..१२ .२४८३ ही गाडी पकडली असता धारूर वनपरिक्षेत्राचे अधिकारी ईश्वर गुणवंत यांना कारवाई करून गाडी ताब्यात घेण्यासाठी त्यांना वारंवार फोन करून ते



आले नाहीत का तर यामागे आर्थिक कारण पण असु शकते.इतकेच नव्हे तर युसूफवडगांव पोलीस स्टेशन मध्ये पण वारंवार फोन करून ते पण आले उलट कारण देत त्यांनी हे आमच्या आधिकार क्षेत्रात येत नसल्याचे कारण देत त्यांनी पण कारवाईस टाळाटाळ केली जर प्रशासनच अश्या लाकुड चोरांना पैसे घेऊन सहकार्य करणार असेल तर हे फार मोठी वाईट गोष्ट आहे.मानवला प्राणवायु देणारे झाड तोडणाराला प्रशासन मदत करून निसर्गाची हानी करणार असेल तर मग या वनधिकाऱ्याच्या काय काम आहे.तरी प्रशासनाने अश्या या कामचुकार व लाकुड चोरांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.

# वॉर्ड क्रमांक ११ मध्ये सय्यद एजाज यांनाच संधी द्या; युवक आणि नागरिकांची मागणी

गेवराई । प्रतिनिधी

आगामी नगर परिषद पोट निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेवराई शहरातील राजकीय वातावरण तापू लागले असून, विशेषतः वॉर्ड क्रमांक ११ मधील उमेदवारीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या वॉर्डमधून माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनाच पुन्हा उमेदवारी देण्यात यावी, अशी जोरदार मागणी स्थानिक युवक आणि नागरिकांकडून होत आहे.काही काळापूर्वी झालेल्या निवडणुकीत सय्यद एजाज यांचा अत्यंत अल्प मतांनी पराभव झाला होता. मात्र, पराभवाने खचून न जाता त्यांनी वॉर्डातील आपला जनसंपर्क अधिक वृद्धिंगत केला. सुख-दुःखाच्या प्रसंगी



धावून जाणे असो वा नागरिकांच्या नागरी समस्या सोडवणे, एजाज यांनी सदैव तत्पर राहून कामे केली आहेत. त्यांच्या याच लोकाभिमुख कार्यपद्धतीमुळे आता वॉर्डातील तरुण वर्ग त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.वॉर्डातील विकासाचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी एका अभ्यासू आणि सक्रिय नेतृत्वाची गरज आहे. सय्यद एजाज यांनी कार्यकाळात रस्ते, पाणी आणि स्वच्छतेची अनेक विकासकामे मार्गी लावली होती. केवळ नशिबाची साथ नसल्याने गेल्या वेळी त्यांचा विजय थोडक्यात हुकला. मात्र, यावेळी त्यांना संधी दिल्यास ते निश्चितच मोठ्या मताधिक्याने निवडून येतील, असा विश्वास स्थानिक युवकांनी व्यक्त केला आहे.

# श्रद्धा केकानचे दहावी परीक्षेत यश

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील खंडाळा येथील रहिवाशी असलेली तथा मोरगाव येथील नागनाथ विद्यालयात शिकत असलेल्या श्रद्धा दैवान केकान या शेतकऱ्याच्या मुलीने दहावी बोर्डाच्या परीक्षेमध्ये ८७.८० टक्के मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. यामध्ये तिने मराठी प्रथम भाषा-८६ मार्क, हिंदी २/३ भाषा-८० मार्क, इंग्लीश २/३ भाषा-८५, मॅथ-८६, सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी-९२, सोशल सायन्स-९० असे मार्क घेतले आहेत.



दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल दि.८ मे रोजी जाहीर करण्यात आला असून यामध्ये श्रद्धा दैवान केकान या विद्यार्थिनीने ८७.८० टक्के मिळवून यश संपादन केले आहे. शाळेने आपली उत्कृष्ट यशाची परंपरा यावर्षी देखील कायम ठेवली आहे. श्रद्धा केकान हिने शाळा संपल्यानंतर शेतात काम करून परीक्षेमध्ये मोठे यश संपादन केल्यामुळे शाळेतील सर्व शिक्षक व गावातील प्रतिष्ठीत नागरिकांकडून तिचे कौतूक केले जात आहे..

# चौसाळा शाळेचा दहावीचा ८८.२८ टक्के निकाल

चौसाळा । प्रतिनिधी

येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेने शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली असून इयत्ता दहावीच्या परीक्षेत विशेष प्राविण्य १२,प्रथम श्रेणी ४२,द्वितीय श्रेणी ३८, पास ०६ विद्यार्थी झाले असून शाळेचा एकूण निकाल ८८.२८ टक्के सह निकालाची उल्लेखनीय चमक कायम राखली आहे. चौसाळा येथील शाळा जिल्हा भरात विविध उपक्रमाने शाळेचे नावलौकिक करत असते, त्याचप्रमाणे शाळेने याही वर्षी देखील प्रशासनाने कॉफी मुक्त अभियान राबवलेले असताना देखील शाळेने आपली शैक्षणिक गुणवत्ता कायम राखली आहे शैक्षणिक वर्ष २०२६ मध्ये एकूण माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत प्रविष्ट विद्यार्थी १११ बसले होते त्यापैकी ९८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाळेचा एकूण निकाल ८८.२८ टक्के लागला आहे शाळेतून प्रथम क्रमांकाने सागर बापू माने ९४.२० टक्के द्वितीय क्रमांकाने शुभम रंजित शिंदे ९२.४० टक्के तृतीय क्रमांक श्रावणी महादेव काटवटे ९१.६० टक्के घेऊन उत्तीर्ण झाले आहेत तसेच दोन विद्यार्थी उल्लेखनीय गुणा सह उत्तीर्ण झाले आहे त्यामध्ये प्रतीक प्रकाश मोटे ९०.८०% तर सलोनी विजय कोळेकर ९०.००% घेऊन उत्तीर्ण झाले आहेत, या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजा हंपे, एसएससी विभाग श्री प्रमुख सुभाष काकड, शालेय समितीचे अध्यक्ष विनोद शिंदे, उपाध्यक्ष श्रीमती जोगदंड सर्व सदस्य ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्रीम. प्रणिता गंगाखेडकर, केंद्रप्रमुख श्री सपाटे सर यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक श्री विनायक तोताडे विजय कोळेकर लक्ष्मण राऊत सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन व स्वागत केले.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyalokatanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# दोन दिवसांत आरोपींना बेड्या ठोकल्या नाहीत, तर पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग रोखून धरला जाईल-आमदार रोहित पवार

**पुणे । प्रतिनिधी**

दोन दिवसांत आरोपींना बेड्या ठोकल्या नाहीत, तर पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग रोखून धरला जाईल, असा थेट इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी दिला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) चे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर आळंदी म्हातोबा (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीत सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास आयोजित कार्यक्रम आणि प्रवचन आटोपल्यानंतर शनिवारी (ता. ०९) पुण्याकडे परतत होते. सकाळी दहाच्या सुमारास काही अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या वाहनाचा पाठलाग करत गाडी अडवली. त्यानंतर त्यांच्या अंगावर काळी शाई फेकण्यात आली तसेच धक्काबुक्की करण्यात आली आहे. दरम्यान या घटनेच्या निषेधार्थ लवांडे यांची भेट घेण्यासाठी व आरोपींवर कारवाई करण्यात यावी यासाठी रोहित पवार लोणी काळभोर येथील पोलीस ठाण्यात येऊन कारवाई करावी यासाठी आले होते. यावेळी प्रसार माध्यमाशी रोहित पवार बोलत होते.

यावेळी बोलताना रोहित पवार यांनी अनेक गंभीर आरोप केले. विकास लवांडे यांना काही दिवसांपूर्वी दोन जणांनी बंदूक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली होती. या टोळीत तो 'भंडारी' नावाचा बोंदू महाराज आणि कांचन नावाचा सराईत गुन्हेगार सामील आहे, असा खळबळजनक दावा त्यांनी केला आहे. या गुन्हेगारांवर तातडीने कडक कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.



पोलिसांनी याप्रकरणी कडक कलमे लावून गुन्हेगारांना ताब्यात घेण्याचे आश्वासन दिले आहे. आम्ही पोलिसांच्या वर्दीचा आदर करतो, म्हणून त्यांना दोन दिवसांचा वेळ दिला आहे. जर दोन दिवसांत काही ठोस कारवाई झाली नाही, तर सोलापूर नॅशनल हायवेवर सकाळी १० ते ११ च्या दरम्यान चक्का जाम आंदोलन केले जाईल, असेही रोहित पवार यांनी ठणकावून सांगितले.

विकासभाऊंनी आधीच निर्णय घेतला होता. की इथं मी आंदोलन करणार हे आंदोलन करणार. जोपर्यंत तो भंडारी भोंदू बाबा भोंदू महाराज जो आहे. त्याला ताब्यात घेत नाही तोपर्यंत मी इथं बसून राहणार. आम्ही त्यांना विनंती केली की दोन दिवस आपण पोलिसांना वेळ देऊया. आणि जर दोन दिवसात काही नाही झालं तर आम्ही अजून एक पत्र दिलेलं आहे. वारकरी संप्रदायाचा वारंवार अवमान करणाऱ्या आणि संतांबद्दल आक्षेपार्ह विधाने करणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध आता पुण्यात रणशिंग फुंकले गेले आहे. विकास लवांडे यांच्यावर झालेल्या शाईफेकीनंतर आता या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि 'बोंदू महाराजां'ना अटक करण्यासाठी वारकरी संप्रदायाने आक्रमक भूमिका घेतली आहे. असेही बोलताना रोहित पवार यांनी सांगितले.

रोहित पवार यांनी या 'बोंदू महाराजां'च्या शैक्षणिक संस्थांवरही टीका केली. आळंदी आणि नागपूर येथील त्यांच्या शाळांमध्ये बहुजन समाजातील मुला-मुलींना प्रवेश नाकारला जातो. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा हा अपमान आहे. संतांच्या नावाने शिवीगाळ करणे आणि भेदभाव करणे, हे महाराष्ट्राच्या संस्कृतीला शोभा देणारे नाही, अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला.

जेव्हा संतांचा, महापुरुषांचा अपमान केला जातो, तेव्हा सत्ताधारी पक्षाचे नेते बिळात जाऊन का बसतात? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. आम्ही कायम संतांच्या, शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांसोबत आहोत आणि या विचारांना नख लावणाऱ्यांचा लढा असाच सुरू राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## आंबेगावमध्ये कांद्याची काढणी करताना अचानक महिलेचा मृत्यू, उष्माघाताने मृत्यू झाल्याचा अंदाज

**आंबेगाव । प्रतिनिधी**

राज्यात दिवसेंदिवस तापमानाचा पारा वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या तापमानामुळं नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. राज्याच्या बहुतांश भागात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेला आहे. काही ठिकाणी उष्माघातामुळं मृत्यू झाल्याच्या घटना देखील घडल्या आहेत. अशीच एक घटना पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यात घडली आहे. एका महिलेचा मृत्यू झाला आहे. उष्माघाताने मृत्यू झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.



नकुशा बाळू सुपे, वय ३३ वर्षे, या मूळच्या खेड तालुक्यातील वाडा-सुपेवाडी येथील रहिवासी होत्या. त्या सध्या कांदा काढणीच्या कामानिमित्त आमोंडी येथे आल्या होत्या. कांदा काढणी करत असताना दुपारच्या सुमारास त्यांना अचानक चक्कर येऊन त्या खाली कोसळल्या. यानंतर सोबतच्या कामगारांनी त्यांना तातडीने शिनोली येथील खासगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने तेथील डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी अन्यत्र हलवण्याचा सल्ला दिला. त्यानंतर सदर महिलेला घोडेगाव ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र तेथे डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. प्राथमिक माहितीनुसार उष्माघातामुळे मृत्यू झाल्याचा अंदाज घोडेगाव ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांनी व्यक्त केला आहे. दरम्यान मृतदेह शवविच्छेदनासाठी मंचर उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला असून शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. या अचानक घडलेल्या घटनेमुळे सुपे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. राज्यात वाढत्या तापमानामुळे नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. विशेषतः दुपारच्या वेळेत उन्हात काम करणाऱ्यांनी पुरेशी खबरदारी घेणे गरजेचे असल्याचे सांगितले जात आहे.

## पावन भिक्षा ग्रंथाचे प्रकाशन



**पुणे । प्रतिनिधी**

ज्येष्ठ समर्थ भक्त शिलाताई देशमुख यांनी समर्थ रामदास स्वामी कृत आणि पू. स्वामी गोविंद देव गिरि यांनी अनुवादित केलेल्या पावन भिक्षा दे दो राम या चौपाई वर केलेल्या विवेचनात्मक ग्रंथाचे प्रकाशन पुणे येथील वेदश्री तपोवन येथे डॉ. विजय लाड आणि सौ. विद्याताई लव्हेकर यांच्या हस्ते ७ मे रोजी झाले.

श्रमाने मिळवलेली पवित्र भिक्षा अंगिकारून राष्ट्रोद्धासाठी आपले जीवन समर्पित करून मिळालेल्या नरदेहाला पावन कसे करावे हे सूत्र रामदास स्वामींचे वांग्मय आपल्याला शिकवते असे मत या प्रसंगी दासबोध सखोल अभ्यास फाउंडेशन चे संचालक तथा श्री सुंदर मठ, शिवथरघळ येथील विश्वस्त डॉ. विजय लाड यांनी व्यक्त केले.

या वेळी श्रीमती शिलाताई देशमुख यांची अमृत महोत्सवा निमित्त धान्य आणि ग्रंथ तुला करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनिरुद्ध देशमुख , अंबरीश देशमुख, सिंधू देशपांडे, सुधांशु रथ, अपर्णा देशमुख , स्वानंदी रथ आणि ज्योती प्रसाद देशमुख यांनी परिश्रम घेतले.

## भेसळखोर व्यापाऱ्यांवर पणन विभागाचा बडगा; परवाना रद्द करण्याच्या सूचना

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्या, खासगी बाजार येथे व थेट पणनद्वारे खरेदी-विक्रीत भेसळखोरांना आता पणन विभागाने रडारवर घेतले आहे. त्यामध्ये शेतमालाच्या तपासणीअंती अन्नधान्य, फळे-भाजीपाला यामध्ये भेसळ, घातक रसायनांचा वापर केल्याचे आढळल्यास अन्न भेसळ करणाऱ्यांचा परवाना रद्द करण्याची कारवाई करण्याच्या महत्त्वपूर्ण परिपत्रकीय सूचना पणन संचालक शरद जरे यांनी बाजार समित्यांना दिल्या आहेत. तसेच त्या परवानाधारकास उपलब्ध करून दिलेल्या सोयी-सुविधा काढून घेण्याची कार्यवाही तत्काळ करण्यात यावी, असेही म्हटले आहे.



महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मध्ये बाजार समित्यांसाठी महत्त्वाच्या तरतुदी आहेत. शेती उत्पादकांचा माल योग्यरीतीने विकला जावा, तो फसवला जाऊ नये तसेच खरेदीदाराला एकत्रित माल मिळून सरस नीरस प्रत ठरविणे सोयीचे व्हावे. चांगल्या दर्जाचे शेतीमालाचे उत्पादन होण्यास उत्तेजन मिळण्यासाठी नियंत्रित बाजार क्षेत्रांची स्थापना करण्यात आली.

तसेच बाजार क्षेत्रातील खरेदी-विक्री संबंधाने भेसळ टाळण्यासाठी वजनमापेबाबत तक्रारी उद्भवल्यास त्याचे निराकरणाची बाजार समिती कायद्यातील तरतुदीनुसार कार्यवाही करता येईल. बाजार क्षेत्रात शेतमाल खरेदी-विक्री व्यवहारामध्ये फळे कृत्रिमरीत्या पिकविण्यासाठी आणि त्यांची गोडी वाढविण्यासाठी कृत्रिम रसायनांचा वापर करणे, फळे-भाजीपाला व अन्नधान्यांना कृत्रिमरीत्या रंगविणे, फळे-भाजीपाला व इतर शेतीमाल दीर्घकाळ टिकविण्यासाठी तसेच आकर्षक दिसण्यासाठी घातक रसायनांचा वापर करणे इत्यादी बाबी टाळण्यासाठी वेळोवेळी परवानाधारक व्यापाऱ्यांची काटेकोरपणे तपासणी करून आवश्यक उपाययोजना करावी, असेही त्यांनी नमूद केले आहे. दैनंदिन भाजीपाला, फळे व फुले यांची विक्री, वाहतूक, साठवणासाठी दिलेल्या जाडीपेक्षा कमी प्लास्टिक व थर्माकोलचा वापर टाळून पर्यावरणपुरक साहित्यांचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असेही त्यांनी परिपत्रकात म्हटले आहे.

## पोलिस हवालदार निलंबित; पबमध्ये सापडल्याने पत्नीचा छळ उघड

**पुणे । प्रतिनिधी**

कोम्बिंग ऑपरेशन ड्युटी असल्याचे खोटे सांगून प्रत्यक्ष मात्र पबमध्ये महिलेबरोबर मज्जा मारत असताना पत्नीने पकडल्यानंतर पत्नीचा छळ करणाऱ्या पोलिस हवालदाराला निलंबित करण्यात आले आहे. हनुमंत गुलाब कांबळे (रा. पीरवस्ती, वडकी) असे निलंबित केलेल्या पोलिस हवालदाराचे नाव आहे. पोलिस उपायुक्त डॉ. सागर कवडे यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत.

कांबळे याच्या विरुद्ध त्याच्या पत्नीने कौटुंबिक छळाची फिर्याद काळेपडळ पोलिस ठाण्यात दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी कांबळे आणि एका महिलेच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. कांबळेच्या वर्तनामुळे शिस्तबद्ध असलेल्या पोलिस खात्याची प्रतिमा मलीन झाल्याचा ठपका ठेवत त्याला पोलिस खात्यातून निलंबित केले आहे. कांबळेच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. पोलिस हवालदार हनुमंत





कांबळे याने एका महिलेसोबत संगनमत करून, त्यांच्या दोघांचे अनैतिक संबंध लपवून ठेवले. पतीने पोलिस असल्याचे व वर्दीचा धाक दाखवून वेळोवेळी मारहाण केली. तसेच घरातून हाकलून देत घटस्फोट देण्याची धमकी देऊन त्यांचा शारीरिक व मानसिक छळ केला.

तसेच आरोपी महिलेने देखील फिर्यादींना शिवीगाळ करून हाताने मारहाण केली. फिर्यादींचा पती अनेकदा त्यांच्यासोबत खोटे बोलत होता. फिर्यादींनी पतीला आणि महिलेला अनेकदा पकडले होते. १५ जून २०२६ रोजी फिर्यादींनी पती कांबळेला रात्री फोन केल्यावर त्याने कोम्बींगची ड्युटी असल्याचे सांगितले. प्रत्यक्षात तो पिंपरी चिंचवड येथील सी डॉक या पबमध्ये त्या महिलेसोबत दारू पित बसला होता. पत्नीने तेथे जाऊन जाब विचारल्यावर मी पोलिस आहे. तू काही करू शकत नाही, असे बोलला. दरम्यान, सतत होणाऱ्या त्रासाला कंटाळून अखेर फिर्यादींनी पोलिस ठाण्यात धाव घेत पती आणि महिलेच्या विरुद्ध तक्रार दिली.

## इंदापुरात शेतकरी आक्रमक, 'या' तारखेपासून आमरण उपोषणचा इशारा

**इंदापूर । प्रतिनिधी**

राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रेय भरणे प्रतिनिधित्व करत असलेल्या इंदापूर तालुक्यात पाणी प्रश्न अधिकच तीव्र झाला असून शेतकरी आक्रमक झाले आहेत.शेतकऱ्यांनी कार्यकारी अभियंता पुणे तसेच मुख्य अभियंता पुणे यांना निवेदन देत १० मे २०२६ पासून कार्यकारी अभियंता कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. खरीप हंगामासाठी २१ दिवसांचे आवर्तन मिळाले असले, तरी रब्बी आणि उन्हाळी हंगामासाठी केवळ १५ दिवसांचे पाणी मिळाल्याचा आरोप करण्यात आला आहे.




उन्हाळी आवर्तन किमान २० दिवसांचे मिळावे,तसेच इंदापूरचे आवर्तन सुरू असताना दौंड, बारामती आणि होळ परिसरातील होणारा पाण्याचा उपसा तात्काळ बंद करून कारवाई करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.दरम्यान,मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास १० मे पासून आमरण उपोषण सुरू करण्यात येणार आहे.तरीही न्याय न मिळाल्यास ११ मे २०२६ रोजी कार्यकारी अभियंता कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशाराही शेतकऱ्यांनी निवेदनाच्या माध्यमातून दिला आहे. गेल्या दहा ते पंधरा दिवसांपासून आमची मागणी सुरू आहे. वरच्या तालुक्यांमध्ये पाणी सुरू आहे,मात्र इंदापूर तालुक्यात आलं की १४४ कलम लागू केलं जातं.हा अन्याय आम्ही सहन करणार नाही.शासन दरबारी वारंवार चकरा मारून निवेदन दिलं,पण अद्याप न्याय मिळाला नाही.आमची पिकं पाण्याअभावी जळून गेली आहेत.राज्याचे कृषिमंत्री इंदापूर तालुक्याचे असतानाही आम्हाला पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.पाणी आलं की लाईट बंद केली जाते, हा अन्याय आम्ही खपवून घेणार नाही.आता उद्रेक होण्याची वेळ आली आहे.गरज पडली तर आम्ही रास्ता रोको आंदोलन करू,पाण्यासाठी बलिदान द्यायलाही तयार आहोत असं शेतकऱ्यांचं म्हणणं आहे. कार्यकारी अभियंता आणि मुख्य अभियंता यांना आम्ही लेखी निवेदन दिलं आहे.

## भामा आसखेड धरणातून पाणी सोडले; सिद्धेगव्हाणपर्यंत बंधारे भरले

**खेड । प्रतिनिधी**

पुणे जलसंपदा विभागाच्या प्रशासनाने खेड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मागणीनुसार भामा-आसखेड धरणातून पाणी सोडल्याने तालुक्यातील सिद्धेगव्हाणपर्यंतचे बंधारे पाण्याने भरले आहेत. सोडलेल्या पाण्याचा फायदा शेतकऱ्यांच्या उन्हाळी पिकांना होत असून, सध्या भामा आसखेड धरणामध्ये ४७.४७ टक्के दिलासादायक पाणीसाठा शिल्लक आहे.



खेड, शिरूर, दौंड आणि हवेली या चार तालुक्यांना शेतीसाठी, तसेच अनेक गावांना पिण्याचे पाणी या धरणातून पुरवले जाते. याशिवाय, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील काही भागालाही या धरणातून पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे ८.१४ टीएमसी क्षमतेचे भामा आसखेड धरण या चार तालुक्यांसाठी हरितक्रांतीचे वरदान ठरले आहे. मागील आठवड्यात शेतकऱ्यांच्या मागणीनुसार जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी धरणापासून सिद्धेगव्हाणपर्यंतचे बंधारे भरण्यासाठी तीन दिवस पाणी सोडले होते. या पाण्याचा प्रमुख फायदा शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्यासाठी होत आहे. शेतकऱ्यांनी मागणी करताच अधिकाऱ्यांनी तत्काळ पाणी सोडल्याने शेतकरीवर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्ह्यातील इतर धरणांच्या तुलनेत भामा आसखेड धरणातील पाणीसाठा अधिक असल्याचे दिसून येत आहे. पावसाळा सुरू होण्यासाठी अवघा एक महिना शिल्लक असताना धरणातील उपलब्ध पाणीसाठा दिलासादायक मानला जात आहे. दि. २९ एप्रिल ते १ मेदरम्यान धरणातून पाणी सोडण्यात आल्याने सिद्धेगव्हाणपर्यंत भीमा व भामा नदीवरील कोल्हापूर पद्धतीचे बंधारे पाण्याने भरले आहेत. लवकरच तिसरे उन्हाळी आवर्तन सोडण्यात येणार असून, कालवा समितीच्या नियोजनानुसार दौंड तालुक्यातील आलेगावपागापर्यंतचे एकूण १८ बंधारे पाण्याने भरले जाणार आहेत. या पाण्याचा फायदा उन्हाळी पिकांसह अनेक गावांच्या पाणीपुरवठा योजनांनाही होणार आहे.

## जमिनीच्या वादातून वडील, सावत्र आई आणि भावाकडून तरुणाची हत्या

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती तालुक्यातील जोगवडी येथे कौटुंबिक वादाचे अत्यंत भीषण रूप समोर आले आहे. शेतजमिनीच्या वादातून एका तरुणाची त्याच्या स्वतःच्या वडिलांनी, सावत्र आईने आणि सावत्र भावाने हत्या केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी रात्री घडली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

सूरज संजय गुळूमकर असे मृत तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी (दि. ८) रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, गुळूमकर कुटुंबामध्ये गेल्या काही दिवसांपासून शेतजमिनीच्या मालकी आणि वाटणीवरून वाद सुरू होता. शुक्रवारी रात्री हा वाद पुन्हा उफाळून आला आणि घरातील वातावरण तणावपूर्ण बनले. वाद विकोपाला गेल्यानंतर सूरज याच्यावर त्याचे वडील संजय धोंडीबा गुळूमकर, सावत्र आई माया संजय गुळूमकर आणि सावत्र भावाने मिळून हल्ला केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात सूरज गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने उपचारासाठी नेण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र त्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे समोर आले. घटनेची माहिती ळिताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. परिसराची पाहणी करून पंचनामा करण्यात आला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. पोलिसांनी संशयितांना ताब्यात घेतल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे या घटनेमुळे जोगवडी परिसरात भीती आणि हळहळ व्यक्त केली जात आहे. केवळ जमिनीच्या वादातून एका तरुणाचा जीव गेल्याने नागरिकांकडूनही दुःख व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून नेमका वाद किती दिवसांपासून सुरू होता, तसेच घटनेच्या वेळी नेमके काय घडले याचा तपशील तपासातून समोर येणार आहे.

## चाकण एमआयडीसीत बिबट्याची दहशत; सॅनी हेवी व मर्सिडीज बेंझ परिसरात सलग एन्ट्री

**चाकण । प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील चाकण एमआयडीसी परिसरातील दोन बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आवारात बिबट्याचा वावर आढळल्याने औद्योगिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे. सॅनी हेवी इंडस्ट्रीज आणि मर्सिडीज बेंझ या नामांकित कंपन्यांच्या परिसरात सलग दोन दिवस बिबट्या दिसून आल्याने कामगार व कर्मचारी वर्गामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज आणि व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.

धक्कादायक बाब म्हणजे कंपनीच्या उत्पादन विभागाजवळील आतील परिसरातही बिबट्याचा मुक्त वावर दिसून आल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. वन विभागाने परिसरात शोधमोहीम सुरू केली असून, बिब ट्याच्या हालचाली दिसलेल्या ठिकाणी दोन पिंजरे लावण्यात आले आहेत. गुरुवारी (दि. ७) सॅनी हेवी इंडस्ट्रीजच्या आवारात, तर शुक्रवारी (दि. ८) सकाळच्या सुमारास मर्सिडीज बेंझ कंपनीच्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात बिबट्या फिरताना दिसून आला.घटनेची



माहिती मिळताच कंपनी प्रशासनाने तातडीने वन विभागाशी संपर्क साधला. त्यानंतर वन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. मात्र, पहिल्या दिवशी बिबट्याचा ठावठिकाणा लागला नाही. यानंतर पुन्हा त्याच परिसरात तसेच मर्सिडीज बेंझ कंपनीच्या आवारात बिबट्या दिसल्याची माहिती समोर आली. कंपनी प्रशासनाने कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना देत अनावश्यक गर्दी टाळण्याचे आवाहन केले आहे. शुक्रवारी वन विभागाने पुन्हा परिसराची पाहणी केली. परिसरात दोन पिंजरे लावण्यात आल्याची माहिती चाकण वन विभागाचे संतोष कंक यांनी दिली.